## बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ०६ | बुधवार, दि.१७ जानेवारी २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


# राज्य मागासवर्गीय आयोगाचा कारभार अपारदर्शक तसेच ओबीसी विरोधी-ओबीसी संघटनांचा आरोप

- मराठा सर्वेक्षण काम अद्याप कायद्याच्या कचाट्यात?
- राज्य मागासवर्गीय आयोगाकडून माहिती देण्यास टाळाटाळ, गुन्हा दाखल करण्याची मागणी

**पुणे** : राज्य मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षसह, तीन सदस्यांनी राजीनामा दिल्या नंतर, राज्य सरकार कडून त्यांच्या जागेवर सदस्य नेमून मराठा समाजाचे सर्वेक्षणाचे काम सुरू झाल्याचे बोलले जात आहे . पण माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त झालेल्या माहिती अनु-सार सदर प्रकरणात अंतिम न्याय निर्णय होणे बाकी आहे असे आयोगाने कळविले आहे. राज्य मागासवर्गीय आयोगाकडे मराठा समाजच्या सर्वेक्षणा संदर्भात, कार्यकक्षा, मागासलेपणाचे निकष अश्या विविध प्रकारची माहिती मागवण्यात आली होती. त्याला उत्तर देताना, राज्य मागासवर्गीय आयोगाकडून माहिती अधिकारी मेघराज भाटे यांनी सदर प्रकरणात अंतिम न्यायनिर्णय होत नाही तो पर्यत माहिती देऊ शकत नाही असे उत्तर दिले आहे.

सदर उत्तर हे चुकीची आहे दिशाभूल करणारे आहे व असे उत्तर देऊन राज्य मागासवर्गीय आयोग जनतेची फसवणूक करीत आहे. माहिती मिळाली नाही म्हणून, प्रथम अपील अधिकारी श्रीमती अ. उ. पाटील यांच्याकडे प्रथम अपील करण्यात आले, व जण माहिती अधिकारी मेघराज भाटे यांनी शिष्टभंग केल्या मुळे त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी अशी लेखी तक्रार करण्यात आली. त्याला ही प्रतिसाद देण्यात आला नाही व टोलवाटोलवी ची उत्तरे देण्यात आली.

सदर काम काज सगळे अतिशय अपारदर्शक पणे सुरू असून जनतेला या बद्दल कुठली ही माहिती दिली जात नाही आहे. लाखो रुपायांचे काम काही विशिष्ट संस्थाना नियमबाह्य पद्धतीने दिले असून त्यात मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप ओबीसी संघटना करत आहेत. जर प्रकरणात अंतिम न्याय निर्णय झाला नाही तर इतर संस्था ना काम काज कसे दिले आहे असा ही सवाल ओबीसी संघटना विच-रत आहेत. राज्य मागासवगीय आयोगाचे मुख्य केंद्रबिंदू हा ओबीसी आहे , ओबीसी सम ाजाचे मत सर्वेक्षणात घेणार नाही का? ओबीसी समाजाचे आक्षेप, सूचना, हरकती न ऐकताच आयोग निर्णय घेणार आहे का ? असा एकांगी जमवलेली माहिती, कोर्टात टिकेल का? राज्य मागासवर्गीय आयोगाने ओबीसी विरोधी भूमिका घेतली आहे, ओबीसी समाजाला सवत्रपणाने वागवत आहे. राज्य मागासवर्गीय आयोग हा सध्या ओबीसी विरोधी आहे असे स्पष्ट दिसते आहे. जण माहिती अधिकारी आणि सदस्य सचिव यांच्या कडून ओबीसी कार्यकरत्यांना अपमानास्पद वागणूक मिळत आहे.

माहिती देण्यास होणारी टाळाटाळ व चुकीची माहिती देऊन दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यां विरोधात कडक कायदेशीर कारवाही करण्यासाठी सामाजिक न्याय विभाग व मंत्री अतुल सावे यांच्या कडे तक्रार केली आहे. तसेच चुकीची माहिती देऊन फसवणूक केल्याबद्दल व कर्तव्यात कसूर केल्याबद्दल जण माहिती व संशोधन अधिकारी मेघराज भाटे व सदस्य सचिव श्रीमती अ. उ. पाटील यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात यावा अशी मागणी ओबीसी संघटना ने केली आहे . न्याय नाही मिळाला तर न्यायालयात याचिका करण्यात येईल.

# राहुल नार्वेकरांनी संविधानाची हत्या केलीय;असीम सरोदें

**मुंबई–** शिवसेनेच्या फूटीमध्ये तत्कालीन राज्यपाल फालतू माणूस, त्यांची भूमिका संशयास्पद होती. सर्वोच्च न्यायालयाने केवळ बहुमत ग्राह्य धरूनये सांगितले नव्हते.

त्याला कायदेशीर आधार काय याचा विचार करावा असं कोर्टाने सांगितले. राहुल नार्वेकरांचा निर्णय हा सर्वोच्च न्यायालयाचा अपमान आहे. १० व्या परिशिष्ठाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाचे ५ न्यायाधीशांचे घटनापीठ बसते. परंतु हा पक्षांतर्गत वाद म्हणून राहुल नार्वेकर निकाल देतात.विधानसभा अध्यक्ष असाच निर्णय देणार असं लोक म्हणत होते. अन्यायच होणार हे लोकशाहीसाठी चांगले आहे का हा प्रश्न जनतेने विचारला पाहिजे. राहुल नार्वेकरांनी लोकशाहीचा, संविधानाची हत्या केली आहे. सवीच्च न्यायालयाच्या निकालाचा अपेक्षाभंग केला आहे. हा खटला म्हणजे केवळ उद्धव ठाकरेंचा नाही. वाईट प्रवृत्तीचे राजकारण वाढत राहणार हा चिंतेचा मुद्दा आहे. ही परिस्थिती लोकशाहीसाठी चांगली नाही.मला या निर्णयाने प्रचंड त्रास झालेला आहे अशी परखड भूमिका ॲड. असीम सरोदे यांनी मांडली.

वरळी इथं घेतलेल्या ठाकरे गटाच्या महापत्रकार परिषदेत असीम सरोदे म्हणाले की, पक्षांतर कसं करायचं याबाबतची बेकायदेशीर बाराखडी म्हणून राहुल नार्वेकरांच्या निर्णयाकडे पाहावे लागेल. कायदेविरोधी प्रवृत्ती त्याविरोधात जनतेच्या न्यायालयात बोलले पाहिजे. १० जानेवारी २०२४ च्या निकालाची चिरफाड करणे आवश्यक आहे. त्यातून लोकशाही कशी मारली जाते हे दिसून येते. देशाचे नागरीक असणेही राजकीय संकल्पना आहे.प्रत्येक व्यक्तीनं राजकारणाबद्दल बोलले पाहिजे.चूक आणि बरोबर कोण हे ठरवत असताना एक बाजू घेणे आवश्यक आहे.सत्याची बाजू घेणे गरजेचे आहे.

उद्धव ठाकरे संविधानाच्या बाजूने आहेत.पक्षांतर बंदी कायद्याबाबत सर्वसामान्यांना आता माहिती आहे. त्याबद्दल एकनाथ शिंदे आणि त्यांना फूस लावणाऱ्या देवेंद्र फडणवीसांचे आभार मानले पाहिजे. १० व्या सूचीनुसार संविधान नैतिकता आणण्याचा प्रयत्न १९८५ मध्ये राजीव गांधींनी केला.राजकीय पक्ष चालवताना विश्वासार्हता आणि प्रामाणिक असली पाहिजे. या उद्देशाने पक्षांतर बंदी कायदा अस्तित्वात आला.परिच्छेद १ ए आणि बी महत्त्वाचे आहे.विधिमंडळ पक्ष आणि मूळ राजकीय पक्ष म्हणजे काय हे समजून घ्यायला हवे.विधिमंडळ पक्ष हा आमदारांनी निवडून आलेला पक्ष असतो.त्याचे आयुष्य ५ वर्ष असते. ही अस्थायी स्वरुपाची व्यवस्था आहे.त्यामुळे कायदेशीर त्याला महत्व नाही.आपला मूळ राजकीय पक्ष हा बाळासाहेब ठाकरेंनी स्थापना केलेला आणि त्यांच्या स्वाक्षरीने तयार झालेला पक्ष आहे.मूळ राजकीय पक्षाचे नियंत्रण विधिमंडळ पक्षावर असते.एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत पळून गेलेले अस्थायी विधिमंडळ पक्षाचे सदस्य होते.या कायद्यात २-१ (अ) २-१ (इ) त्यात स्वत:हून राजकीय पक्ष सोडणे आणि दुसरे म्हणजे राजकीय पक्षाने जर एखादा आदेश दिला असेल तर त्याचे पालन करणे आवश्यक असते.जर व्हिपचे पालन केले नाही किंवा पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकीला गेले नाही तर त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई होऊ शकते असं त्यांनी सांगितले.

तसेच परिच्छेद ३ हे या कायद्यातून वगळण्यात आले त्यामुळे पक्षात उभी फूट पडली म्हणून अपात्रतेपासून वाचू शकत नाही. तो गट राजकीय पक्ष काढू शकतात.शिंदे पळून गेलेले आहेत.त्यांनी गट स्थापन केला नाही आणि कुठल्याही पक्षात विलीन झाले नाहीत.त्यामुळे ते अपात्र ठरतात.एकनाथ शिंदेंसह गेलेले सर्व दोन तृतीयांश संख्येने गेले नाहीत. पहिले १६ जण गेले. त्यानंतर अनेकांना आमिष दिले, दबाव टाकला, काहीजण सूरत, गुवाहाटी त्यानंतर मुंबईत काहीजण मिळाले अशाप्रकारे ३८-४० जण झाले. त्यामुळे दोन तृतीयांश संख्येने ते बाहेर पडले नाहीत त्याम ुळे ते अपात्रतेपासून वाचू शकत नाही.जेव्हा एखाद्याची विधानसभा अध्यक्ष म्हणून निवड होते. तेव्हा त्याने निरपेक्ष आणि कायद्याला धरून वागले पाहिजे. विधानसभा अध्यक्षपद मिळाल्यानंतर नैतिकता, प्रामाणिकता ठेऊन त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला पाहिजे असं कायदेशीर आहे.राहुल नार्वेकरांनी पक्षाचा राजीनामा दिला नव्हता.सुप्रीम कोर्टाने संविधानिक नैतिकतेने विधानसभा अध्यक्षांना निर्णय घेण्याचे अधिकार दिले. मात्र विधानसभा अध्यक्षांनी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा विश्वासघात केला असा आरोप असीम सरोदे यांनी केला.

दरम्यान, कुठल्याही कायद्याचा अर्थ आपल्याला वाटेल तसा काढता येत नाही. पक्षांतर बंदी कायद्याचा उद्देश पक्षांतर थांबवणे, पक्षांतर कुणी करू नये यासाठी बनवलेला आहे. संविधानाच्या मूलभूत ढाचात काय हवंय त्या अन्वाये कायद्याचा अर्थ काढला पाहिजे. अपात्रतेचे प्रकरण हे थेट अध्यक्षांकडे गेले नव्हते. हे प्रकरण आधी सवीच्च न्यायालयात गेले. त्यात कोर्टाने काही निरिक्षणे नोंदवली होती त्याचा विचार करून निर्णय घेण्याची जबाबदारी राहुल नार्वेकरांची होती. एकनाथ शिंदेंची निवड बेकायदेशीर आहे असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे.निवडणूक आयोगाच्या कुठल्याही निर्णयाला प्रभाव न ठेवता अध्यक्षांना निर्णय घ्यायचा होता.विधिमंडळ पक्ष हा व्हिप ठरवू शकत नाही. मूळ राजकीय पक्ष व्हिप ठरवू शकतात. अध्यक्षांनी मूळ राजकीय पक्षाने ठरवलेला व्हिप मान्य केला पाहिजे. उद्धव ठाकरेंनी ठरवलेला व्हिप हाच ग्राह्य धरला पाहिजे असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे. ३ जुलै २०२२ रोजी भरत गोगावले यांना व्हिप म्हणून अध्यक्षांनी मान्यता दिली तो बेकायदेशीर आहे असं कोर्टाने म्हटलं आहे.

कारण फुटलेल्या गटाने नेमलेला व्हिप त्याला मूळ राजकीय पक्षाची मान्यता नव्हती. उद्धव ठाकरेंच्या सहीने एकनाथ शिंदेंची नेमणूक झाली. अजय चौधरी यांची व्हिप म्हणून उद्धव ठाकरेंनी केलेली निवड योग्य असल्याचे कोर्टाने म्हटलं आहे. अध्यक्षांनी वाजवी कालावधीत म्हणजे साधारण ३ महिन्याच्या काळात हा निर्णय घेणे अपेक्षित होते.२ मिनिटांत मॅगी तयार होते तसा या प्रकरणाचा निर्णय लागायला हवा होता.परंतु राहुल नार्वेकरांना पुढे करून राजकारण करणारे सर्वजण लोकशाहीद्रोही आहेत असंही असीम सरोदेंनी म्हटलं.

# महामेळाव्यात बांधली निवडणुकांसाठी एकसंघ वज्रमुठ

### घटक पक्षांचे जोरदार शक्तिप्रदर्शन: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर व्यक्त केला विश्वास

**गोंदिया:** महायुतीत सहभागी असलेल्या भाजपा,राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), चाबी संघटना व इतक घटक पक्षांच्या महामेळाव्याचे आयोजन रविवारी गोंदिया येथे करण्यात आले होते. या महामेळाव्यात भाजपसह सहभागी सर्वच घटक पक्षाच्या नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास व्यक्त करीत आगामी लोकसभा निवडणुकीसाठी एकसंघ वज्रमुठ बांधत अबकी बार ४०० पार चा नारा दिला. महायुतीच्या वतीने आयोजित महामेळाव्याच्या मंचावर भाजपचे जिल्हाध्यक्ष येशुलाल उपराडे, माजी मंत्री परिणय फुके, माजी आ.राजेंद्र जैन, चाबी संघटनेचे आ. विनोद अग्रवाल, आ.मनोहर चंद्रीकापुरे, आ.विजय रहांगडाले, शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश शिवहरे, माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आ.हेमंत पटले, संजय पुराम, खोमेश रहांगडाले, केशवराव मानकर, विरेंद्र अंजनकर, गंगाधर परशुरामकर, राकाँ जिल्हाध्यक्ष प्रेम रहांगडाले, रचना गहाणे, राजलक्ष्मी तुरकर, यशवंत गणवीर उपस्थित होते. लोकसभा निवडणूक पुढील दोन महिन्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. त्याच अनुषंगाने या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

लोकसभेच्या राज्यातील ४८ जागेपैकी ४५ जिंकू या विश्वासाने महायुती कामाला लागली आहे. महायुतीच्या घटक पक्षातील कार्यकर्ते व पुढाऱ्यांमध्ये कसलेही मतभेद राहू नये या अनुषंगाने हा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. जा महामेळाव्याच्या मंचावर सर्वच घटक पक्षाच्या नेत्यांनी एकसंघ वज्रमुठ बांधत एकसंघ होत निवडणूक लढविण्याचा संकल्प केला. सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवित त्यांच्या नेतृत्वात सर्व निवडणूक लढण्याचा निर्धार केला.

### शक्तीप्रदर्शन करीत महामेळाव्याला उपस्थिती

**ग्रीनलॅड लॉनमध्ये रविवारी महायुतीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस,भाजप, शिवसेना (शिंदे गट), चाबी संघटना व इतर घटक पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हजेरी लाव-ली. तर महामेळाव्यापुर्वी या तीन प्रमुख पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत मेळाव्यात सहभागी झाले होते.**

### गोपालदास अग्रवाल यांच्या गैरहजेरीची चर्चा

**भाजपचे नेते माजी आ.गोपालदास अग्रवाल हे या महामेळाव्याला अनुपस्थित होते. शिवाय त्यांचे खंदे समर्थकही मेळाव्यात दिसून आले नाही. तर आ. विनोद अग्रवाल हे त्यांच्या चाबी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह या महामेळाव्यात सहभागी झाले होते. यामुळे मेळाव्यात उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये नव्या समीकरणाची आणि माजी आ.गोपालदास अग्रवाल यांच्या अनुपस्थितीचीही चर्चा होती.**



आगामी लोकसभा निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महायुती लढवून अबकी पार ४०० जागा पार करेल. खा.प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा एक दिलाने काम करेल.

**राजेंद्र जैन,** माजी आमदार राष्ट्रवादी काँग्रेस

महायुतीच्या महामेळाव्यात सर्वच घक पक्षांनी एकसंघपणे लोकसभा निवडणूक लढवून जास्तीत-जास्त जागा जिंकून ऐतिहासीक विजयाची नोंद करण्याचा संकल्प केला आहे.

**परिणय फुके,** माजी मंत्री भाजप

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आगामी निवडणूका या महायुतीच्या माध्यमातून लढवून जास्तीत-जास्त जागा जिंकण्याचा संकल्प घेण्यात आला आहे.

**मुकेश शिवहरे,** जिल्हा प्रमुख शिवसेना

### एकसंघ वज्रमुठ ठिक पण जागा कुणाच्या वाट्याला

**आगामी लोकसभा निवडणुकीपुर्वी महायुतीने महामेळाव्याच्या माध्यमातून महायुतीत सहभागी घटक पक्षांची वज्रमुठ दाखविली. पण भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) खा.प्रफुल्ल पटेल यांनी सुद्धा दावा केला. तर भाजपचे माजी मंत्री परिणय फुके यांनी सुद्धा तयारी केली. त्यामुळे महायुतीत हा मतदारसंघ नेमका कुणाच्या वाट्याला ाची चर्चा होऊ लागली आहे.**


शुभारंभ... शुभारंभ... शुभारंभ...

11 Jan

Foodies Well-Come Here
Good Food - Good Mood...

## हॉटेल वेलकम...इन

होप हॉस्पीटल के पास, फुलचुर, आमगाव रोड, गोंदिया
Mob. 8669142053

सभी कुछ आपके बजट मे
वेज थाली रेगुलर
मटन सावजी थाली
चिकन सावजी थाली
खिचड़ी
स्पेशल गट्टा चावल

पार्सल सुविधा

काम में जुनुन होना चाहिये...
और फिर सुकून होना चाहिये...

मंथली सुविधा

ORDER ACCEPTED


# कल्लू यादव गोळीबार प्रकरणात अटक झालेल्या आरोपींची संख्या नऊ; बंदुक व दोन मोटारसायकल जप्त

**गोंदिया:-** माजी नगरसेवक लोकेश ऊर्फ कल्लू यादव यांच्यावर गोळीबार करणाऱ्या व आरोपींना साथ देणाऱ्या आरोपींचे अटक सत्र गोंदिया शहर पोलिसांनी चालविले. आतापर्यंत या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या नऊ झाली आहे. तर आतापर्यंतच्या तपासात पुढे आलेल्या दहा आरोपींपैकी एक मुख्य आरोपी प्रशांत मेश्राम हा अद्यापही फरार आहे.

या प्रकरणात ज्या मावझर बंदुकीतून गोळीबार केली ती बंदुक व गुन्ह्यासाठी वापरलेल्या दोन मोटारसायकल जप्त करण्यात आल्याची माहिती गोंदिया शहर पोलिस ठाण्यात आयोजित पत्रपरिषदेत उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे यांनी दिली आहे. ११ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सावलानी किराना दुकानाच्या समोर हेमू कॉलनी यादव चौक गोंदिया येथे दोन अज्ञात आरोपींनी संगनमत करुन माजी नगरसेवक जखमी लोकेश ऊर्फ कल्लू सुंदरलाल यादव (४२) रा. यादव चौक गोंदिया यांच्यावर बंदुकीने गोळीबार केला. या प्रकरणात १२ जानेवारी रोजी चार आरोपींना अटक करण्यात आली. गोळीबार करण्यासाठी वापरण्यात आलेली पहिली मोटारसायकल एम.एच.३५ एटी ९८१६ हिलचा वापर करण्यात आला. गोळीबार केल्यानंतर ना-गपूरला पळून जाण्यासाठी दुसरी गाडी बदलण्यात आली. त्यात दुसरी गाडी एम एच ३५ झेड ००१३ हिचा वापर करण्यात आला.

१३ जानेवारी रोजी दोन आरोपींना, एका आरोपीला १४ जानेवारी तर १५ जानेवारीला दोन आरोपींना अटक करण्यात आली. आतापर्यंत तपासात आलेल्या दहा आरोपींपैकी नऊ आरोपींना अटक करण्यात आली. तर या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रशांत मेश्राम हा फरार असून त्याचा शोध पोलीस घेत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनात गोंदिया शहरचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत सुर्यवंशी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश लबडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मंगेश वानखडे, पोलीस हवालदार जागेश्वर उईके, कवलपालसिंग भाटीया, सुदेश टेंभरे, निशिकांत लोंदासे, प्रमोद चव्हान, दिपक रहांगडाले, महिला पोलीस हवालदार रिना चौव्हाण, पोलीस शिपाई दिनेश बिसेन, अशोक रहांगडाले, सुभाष सोनेवाने, मुकेश रावते, करण बारेवार, सनोज सपाटे तसेच स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया येथील पथक, सायबर सेल गोंदिया यांनी केली आहे.



### अटक आरोपींची नावे

**१२ जानेवारी रोजी आरोपी गणेश शिवकुमार शर्मा (२१) रा. भिडी ले आउट वरोडा ता. कळमेश्वर जि. नागपूर, अक्षय मधुकर मानकर (२८) रा. सम्राट ग्राउंड शिक्षक कॉलोनी कळमेश्वर जि. नागपूर, धनराज ऊर्फ रिंकू व राजेंद्र राउत (३२) रा. कुंभारेनगर गोंदिया, नागसेन बोधी मंतो (४१) रा. गौतम बुध्द वॉर्ड, श्रीनगर गोंदिया, १३ जानेवारी रोजी शुभम विजय हुमणे (२७) रा. भिमनगर, गोंदिया, सुमित ऊर्फ पंछी विकास डोंगरे (२३) रा. कुंभारेनगर, गोंदिया, १४ जानेवारी रोजी रोहीत प्रेमलाल मेश्राम (३२) रा. कुंभारेनगर, गोंदिया व १५ जानेवारी रोजी नितेश ऊर्फ मोनु लखनलाल कोडापे (२८) रा. विहीरगाव, तिरोडा ह.मु. कुंभारेनगर, गोंदिया व मयुर ऊर्फ सानू विजय रंगारी (२७) रा. सिंगलटोली, आंबेडकर वॉर्ड, गोंदिया याला अटक केली.**

### कुंभारेनगरात लपविली होती बंदूक


**रोहीत मेश्राम व धनराज ऊर्फ रिंकू राऊत या दोघांच्या सांगण्यावरुन नागपूरच्या दोन्ही आरोपींजवळील बंदूक तिरोडा तालुक्याच्या विहीरगाव येथील परंतु सद्या गोंदियाच्या कुंभारेनगरात वास्तव्यास असलेल्या नितेश ऊर्फ मोनु लखनलाल कोडापे (२८) याच्या घरी ती बंदूक लपवून ठेवण्यात आली.**

### पंछी व शुभमने आरोपींसाठी केली दुचाकीची सोय

**आरोपी गणेश शिवकुमार शर्मा व अक्षय मधुकर मानकर या दोघांना गुन्हा करण्यासाठी आरोपी रोहीत मेश्राम, धनराज ऊर्फ रिंकू राजेंद्र राउत यांच्या सांगण्यावरुन शुभम विजय हुमणे व सुमित ऊर्फ पंछी विकास डोंगरे या दोघांनी दुचाकीची व्यवस्था केली होती. गोळीबार केल्यानंतर त्या दोन्ही आरोपींना नागपूरला पळून जाण्यासाठी आरोपी मयूर ऊर्फ सानू विजय रंगारी (२७) रा. सिंगलटोली, आंबेडकर वॉर्ड, गोंदिया याने दुसरी दुचाकी एमएच ३५ झेड ००१३ ची सोय करून दिली.**

### बंदुकीसह तीन जवंत काडतूस जप्त

**आरोपी रोहीत मेश्राम याच्या कडून गुन्हयात वापरलेली एक पिस्टल व ३ नग जिवंत काडतुस व दोन मोटार सायकल, ४ नग मोबाईल जप्त करण्यात आले. या नऊही आरोपींना २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गराड करीत आहेत.**




परमनंट मेगा भरती !! परमनंट मेगा भरती !! परमनंट मेगा भरती !!

## गोमती आदिवासी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या.हेरपार

र.नं.१४६७ ता.देवरी जि.गोंदिया
यांच्या विशेष प्रयत्नातुन
आमगांव-देवरी-गोंदिया क्षेत्रातील युवकांकरीता



गोमती तितराम (अध्यक्ष) लोकनाथ तितराम (सदस्य)

## परमनंट मेगा भरतीची-सुवर्णसंधी...

सुक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमातंर्गत आणि भारत सरकारच्या पसारा ॲक्ट 2005 च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरुपी नौकरीसाठी ISO मान्यताप्राप्त, DG मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सिक्युरीटी ॲण्ड मॅनपावर सर्विसेस प्रा.लिमिटेड व मा.गोमती लोकनाथ तितराम (अध्यक्ष) यांच्या सहकार्याने परमनंट भरतीचे आयोजन केले जात आहे.

आमगांव - देवरी - गोंदिया क्षेत्रातील तरुणांना प्रथम प्राधान्य

पात्रता : युवक कमीत कमी 10 वी पास असावा.
वय : किमान 18 वर्षे व कमाल 40 वर्षे आतील.
वजन : 45 किलो असावे.
उंची : 165 सेमी तसेच युवक हा मेडिकल फिट असावा.



**-सुविधा-** प्रोव्हिडेंट फंड संपूण परिवारासाठी मेडिकल सुविधा, ग्रॅज्युटी, PF पेंशन, विधवा पेंशन अनाथ पेंशन, ग्रुप इन्शुरन्स व नियमाप्रमाणे भत्ते मिळतील. महिन्यातून 4 दिवस सुट्टी, वार्षिक बोनस, जवानांसाठी रुमची व्यवस्था किंवा HRA उलाऊंस.

**- वेतन -** महाराष्ट्र गार्ड बोर्ड/मिनिमम वेज नियमाप्रमाणे (डयुटी : 8 तास, वेतन : 15000 रु. ते 19000 रु.) (डयुटी : 12 तास, वेतन : 20000 रु. ते 23000 रु.) (सुरुवातीचे ओव्हर टाईमचा वेगळा पगार, वार्षिक पेमेंट वाढ व नियमाप्रमाणे भत्ते दिले जातील

**- कागदपत्रे -** आधार कार्ड, 10 वी/12 वी/ ग्रॅज्युएशन पैकी एक शैक्षणिक प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज 2 फोटो, फॉर्म व रजिस्ट्रेशन फिस रु.500/-



- मेगा भरतीची दिनांक व स्थळ -

दि.18/01/2024 ते 22/01/2024 एकुण 5 दिवस सकाळी 8 ते दुपारी 12 वाजे पर्यंत

॥ स्थळ ॥ तालुका क्रिडा संकुल ग्राऊंड चिचगड रोड, देवरी

नाते विश्वासाचे...उज्वल भविष्याचे...

- अधिक माहितीकरीता संपर्क -
श्री.गोरख जगताप (भर्ती अधिकारी) मो.9284125100, अमोल सर मो.7020700546
लोकनाथ बळीराम तितराम मो.9423673439

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.१७ जानेवारी २०२४


## संपादकीय

### महिलांनी लगेच घटस्फोट घेऊ नये!

झपाट्याने बदलत चाललेली कुटुंब व्यवस्था, बिघडलेली सामाजिक रचना, विभक्त होण्याकडे वाढलेला कल, महिलांमध्ये असणाऱ्या व्यक्ती स्वातंत्र्याच्या फालतू कल्पना, जोडीदाराकडून केल्या जाणाऱ्या अवाजवी अपेक्षा, संपुष्टात येत चाललेली साधी समाधानी प्रवृत्ती आणि आपण कामावते आहोत, सुशिक्षित आहोत याची धुंदी, त्यामुळे वाढत चाललेले पती-पत्नीमधील घटस्फोट आजमितीला समाजासाठी मोठं आव्हान आहे. अनेक आणि कल्पनेपलीकडील कारणे या वाढत्या घटस्फोटामागे असतात.

छोट्या-छोट्या किरकोळ वाद-विवादामुळे, घरोघरी होणाऱ्या कलहामुळे, पती-पत्नीमधील समजूतदारपणा आणि संवादाचा अभाव माहेरील लोकांचा प्रमाणापेक्षा जास्त हस्तक्षेप यामुळे फक्त पुरुषच नाही, तर महिलासुद्धा मोठ्या प्रमाणात घटस्फोट घेण्याला प्राधान्य देताना दिसतात. या लेखात आपण पतीचे विवाहबाह्य संबंध आहेत, त्यांच बाहेर अफेअर आहे, त्याने बाई ठेवली आहे, त्याने एखाद्या बाईला घरात आणून ठेवलं आहे, तो एखाद्या महिलेकडे राहायला गेला आहे, तो बायकांवर पैसे उडवित आहे, तो सतत लफडी करतोय, म्हणून फारकत घेऊन वेगळे होणे ही भूमिका अनेक महिलांची असते.

घटस्फोट घेतल्यावर पुढे काय? मुलं असल्यास त्यांचं काय? आपलं भवितव्य काय? आपल्या आई-वडिलांना काय वाटेल, माहेरील कुटुंबात यांचे काय पडसाद उमटतील? सासरचे कितपत आपल्या नवऱ्याच्या अशा वागणुकीला जबाबदार आहेत? त्याच्या अनैतिक संबंधास सासरचे पाठिंबा देत आहे का? त्याला पाठीशी घालत आहेत का? यावर विचार करणे आवश्यक आहे. सासरच्या लोकांचा अजिबात दोष नसेल, तर नाहक त्यांना आपण घटस्फोट घेतल्यास किती मनस्ताप होईल हा दूरचा सखोल विचार अनेक महिला करताना दिसत नाही.

आपल्या पतीचे विवाहबाह्य संबंध आहेत म्हणून त्याला सोडून द्यायचे, वेगळे व्हायचे, त्याच्यापासून कायमचे लांब जायचे या निर्णयातून नेमक काय साध्य होणार आहे, याचा सर्वांगीण विचार होणे आवश्यक आहे. आपल्या नवऱ्याने चुकीचं पाऊल उचललं, तो भरकटला, त्याने प्रतारणा केली, धोका दिला, आपला विश्वासघात केला, आपल्या भावनांशी तो खेळला म्हणून तो आपल्या मनातून उतरला हे शंभर टक्के खरे आहे. कोणतीही स्त्री आपला नवरा कोणासोबत वाटून घेऊ शकत नाही. नवरा जेव्हा परस्त्रीशी संबंध ठेवतो तेव्हा पत्नीचा आत्मसन्मान, मान, तीच स्थान सगळं डळमळीत होत, हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

नवरा त्याच्या अशा चुकीच्या वागणुकीमुळे आपल्याला मनस्ताप देतोय, आपली मानसिकता बिघडते आहे, आपली भावनिक पिळवणूक होते आहे, सहनशीलता संपली आहे, हे बरोबर आहे. मात्र पतीचे विवाहबाह्य संबंध आहेत म्हणून त्याच्यापासून कायदेशीर मार्गाने विभक्त होण्याआधी बायकोने काही गोष्टींवर सखोल विचार करणे अपेक्षित आहे.

सर्वप्रथम तर आपण स्वतः कुठे कमी पडलो आहोत का? ज्यामुळे आपल्या नवऱ्याला दुसऱ्या स्त्रीबद्दल आकर्षण वाटते आहे? आपल्यातील, आपल्या स्वभावातील वागण्या-बोलण्यातील अशा कोणत्या गोष्टी, सवयी अथवा अवगुण आहेत किंवा आपण त्याचा संसार करायला कुठे कमी पडलो आहोत, त्याच्या कोणत्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलेलो नाही, यावर आत्मपरीक्षण जरूर करावे. आपल्या बाजूने आपल्याला कोणत्याही स्वरूपाची चूक जाणवत असेल, तर ती उणीव भरुन काढण्याचा पुरेपूर प्रामाणिक प्रयत्न करावा.

आपल्या बाजूने सर्वतोपरी प्रयत्न करून सुद्धा जर नवऱ्याला दुसऱ्याच स्त्रीमध्ये स्वारस्य वाटत असेल, तरीही तातडीने फारकत घेण्याचा निर्णय न घेता त्याला स्वतःला बदलण्याची संधी आणि वेळ जरूर द्यावा. एकत्र राहून ते करणे शक्य होत नसेल, खूप मानसिक तणाव येत असेल, तर काही कालावधीसाठी लांब राहून पण आपण परिस्थिती बदलण्याची वाट पाहू शकतो. आपल्या सासरचे नातेवाईक, नवऱ्याची मित्रमंडळी जर पूर्णपणे तुमच्या बाजूने असतील, तर परिस्थिती बदलणे खूप सोपं आहे. त्यामुळे धीर धरणे, थोडी वाट पाहणे, संयम ठेवणे गरजेचे आहे.

नवऱ्याच्या आयुष्यात आलेली दुसरी स्त्री कोणत्या हेतूने त्याच्या जवळ आली आहे, हे समजून घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. जेव्हा कोणतीही महिला एखाद्या विवाहित पुरुषासोबत संबंध ठेवते, मूल-बाळ असलेल्या माणसाशी प्रेमप्रकरण करते तेव्हा हे लक्षात घ्यावे की चूक फक्त आपल्या नवऱ्याची नाही, तर समोरील स्त्रीने तिचे वैयक्तिक हेतू, स्वार्थ, फायदा यासाठी देखील त्याला प्रेमाच्या, शारीरिक सुखाच्या जाळ्यात ओढलेले असू शकते. सर्वसामान्यपणे विवाहित पुरुषाच्या आयुष्यात आलेल्या बहुतांश स्त्रिया या स्वतः घटस्फोटित, पतीचे निधन झालेल्या, अविवाहित अथवा स्वतःच्या पतीपासून विभक्त असलेल्या असतात, असे जाणवते. त्यामुळे आपण पण याच स्त्रियांच्या समूहात स्वतःला नेऊन ठेवायचे की आपला संसार सावरण्यासाठी अशा स्त्रियांकडे दुर्लक्ष करायचे, ते आपण ठरवायचे असते.

आपल्या नवऱ्याच्या आयुष्यात आलेली कोणतीही परकी महिला कधीही कायमस्वरूपी त्याच्या आयुष्यात राहणारी नसते, कारण त्यांचे संबंध फक्त एकमेकांच्या गरजा भागवण्यासाठी निर्माण झालेले असतात. शारीरिक आकर्षण तसेच एकमेकांचा वापर करणे हा अशा नात्यांचा केंद्रबिंदू असतो. आपण बायको म्हणून जे कर्तव्य अथवा जबाबदारी पार पाडू शकतो आणि जे कायदेशीर अधिकार पत्नीला असतात, ते कोणत्याही परक्या स्त्रीला नसतात. त्यामुळे आपले वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, कायदेशीर सर्व हक्क आबाधित ठेवणे आपल्याच हातात असते. नवऱ्याच्या आयुष्यातील दुसरी स्त्री फक्त त्याची प्रेयसी असते, तिचे आपल्या घरातील इतर कोणाशीही काही लागेबांधे नसतात, तर बायको ही सासरच्या प्रत्येक कोणाची तरी सून, कोणाची तरी मामी, काकी, भावजय, जाऊ, वाहिनी अशा अनेक नात्यांत गुंतलेली असते.

नवऱ्याचे अफेअर आहे म्हणून घटस्फोटाचा निर्णय घेण्याआधी नवऱ्याच्या, त्याच्या घराच्या इतर जमेच्या बाजू लक्षात घेणे आवश्यक आहे. इतर काही बाबतीत जर आपला नवरा योग्य असेल, परिपूर्ण असेल, सर्व जबाबदाऱ्या आणि कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणारा असेल, कर्तृत्ववान असेल, त्याचे आर्थिक व्यवहार, नोकरी, व्यवसाय इत्यादीमध्ये तो यशस्वी असेल, आपल्याला व आपल्या मुलांना आर्थिक स्थिरता देणारा, सुरक्षा देणारा असेल, निर्व्यसनी असेल, पत्नी म्हणून आपला आदर करणारा, आपल्यावर प्रेम करणारा, आपल्या सुख-दुःखात साथ देणारा, आपली काळजी घेणारा असेल, तर केवळ तो दुसऱ्या कोणत्या स्त्रीमध्ये काही कालावधीसाठी गुंतला किंवा त्याच्याकडून अशी स्वैर राहण्याची चूक झाली म्हणून त्याला कायमच दूर लोटणं अयोग्य आहे. त्यामुळे नवरा कोणामध्ये गुंतला म्हणून तो गुंता सोडवायला घटस्फोट हाच एक पर्याय नाही. लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात, असे आपण म्हणतो, त्यामुळे नवऱ्याला सांभाळून घेणे, सावरणे, त्याला माफ करणे, झालं गेलं विसरुन परत संसाराला लागणे, नक्कीच शक्य आहे.

कायदा, पोलीस प्रशासन नक्कीच तुमच्या पाठिशी आहेत, तुम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी आहेत. आपले कोणतेच प्रयत्न यशस्वी होत नसतील, नवऱ्याकडून कोणताही सकारात्मक बदल त्याच्या वागणुकीत केला जात नसेल, तर मग गांभीर्याने विचार करुन कायद्याचा आधार नक्कीच घ्या. अनेक महिला पतीच्या विवाहबाह्य संबंध आणि त्यातून होणारा मानसिक आघात, मनस्ताप याला कंटाळून आजही आत्महत्या करताना दिसतात. नवऱ्याच्या सासरच्या त्रासाला कंटाळून फक्त स्वतःचे जीवन न संपविता आपल्या मुलाबाळांना घेऊन अनेक महिला मृत्यूला कवटाळतात. इतकी टोकाची भूमिका पण महिलांनी अजिबात घेऊ नये. आपल्या बाजूने शक्य ते सर्व प्रयत्न करून पण परिस्थिती सुधरत नसेल, तर अशा मानाशून्य व्यक्तीसाठी आपले आयुष्य संपविण्यात काहीच अर्थ नाही.

**मीनाक्षी जगदाळे**

स्वामित्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरालाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगणात पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वार्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोंगरे एजन्सीसमोरील रस्ता, शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरालाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०१९३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# पर्यटकांना खुणावतो मिरर हाऊस व हिलटॉप गार्डन

## नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान, घोडा सवारी, बालोद्यानाचा बच्चेकंपनी लुटतात आनंद





**अर्जुनी मोरगाव:** निसर्ग सौंदर्याची मुक्त उधळण असलेल्या राष्ट्रीय उद्यान नवेगावबांध येथे मकरसंक्रांती च्या पर्वावर १४ व १५ जानेवारी ला पर्यटकांनी हजोरोच्या संख्येनी हजेरी लावुन निसर्ग सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटला. या राष्ट्रीय उद्यानातील हिलटॉप गार्डन व मिरर हाऊस पर्यटकांना खुणवत आहे. घोडसवारी आणी बालोद्यानाचा बच्चेकंपनींनी आनंद लुटला.

अर्जुनी मोर. तालुक्याचे भुषण म्हणुन ओळखले जाणारे नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान, उंच उंच पहाडांच्या मधोमध असलेला जलाशय, व जलाशयाच्या मधोमध असलेली मालडोंगरी व शेजारी असलेली चौपाटी पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे. उंच उंच विविध प्रजातीची झाडे व दाट झुडपी तथा विविध प्रजातीचे फुलझाडे या राष्ट्रीय उद्यानाच्या सौंदर्यात कमालीचा भर पाडतो आहे. राष्ट्रीय उद्यान नवेगावबांध चे नैसर्गिक विहंगम दृश्य पर्यटकांना भुरळ घालते. मकरसंक्रांती च्या पर्वावर नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानाला फेरफटका मारला असता पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावल्याचे दिसुन आले. हिलटॉप गार्डन व मिरर हाऊस सध्या तरी पर्यटकांना भुरळ घालते आहे. तत्कालीन नवेगावबांध फॉऊंडेशनने प्रचंड मेहनतीने तयार केलेला हिलटॉप गार्डन सध्या पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. हिलटॉप गार्डन ची डिझाईन व डेव्हलपमेंट इंजी. सुनील तरोणे यांचे सुपीक कल्पनेचे साक्षीदार ठरत आहे. सध्या नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानाचे सौंदर्य आबाधित ठेवण्याचे काम वनव्यवस्थापन समीतीच्या माध्यमातून सुरु आहे. हिलटॉप गार्डन मधे छोट्या मुलांसाठी बोटींग व रॉक गार्डन तथा पुरातन काळापासून तयार असलेली व संपुर्ण नवेगावबांध चे सौंदर्य न्याहाळणारी हिलटॉप छत्रीचे सौंदर्यकरण करण्याची योजना असल्याचे वनव्यवस्थापन समितीचे सदस्य कोमल डोंगरवार यांनी सांगितले.

पर्यटकांना मुक्कामाचे दृष्टीने या ठिकाणी पुर्वीपासुनच तयार असलेले छोटे मोठे विश्रामगृह नव्या रुपाने तयार होत असल्याचे दिसुन येत आहे. शनिवार रविवार ला नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानात पर्यटकांची मोठी गर्दी पहायला मिळते. नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान गतवैभवासाठी तयार होत असुन सध्या या उद्यानात उंच उंच झाडे, हिलटॉप गार्डन, मिरर हाऊस, घोडसवारी, मनोहर उद्यानातील अशोकवृक्ष, जलाशयात पुन्हा सुरु होत असलेली बोटींग व्यवस्था बालोद्यान याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची पाऊले नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानाकडे वळत आहेत. सोबतच पर्यटकांना विविध प्रकारचा नास्ता व उत्तम चमचमीत जेवन मिळण्यासाठी इंजी.सुनिल तरोणे यांनी ग्रीणपार्क उपहार गृह सुरु करुन नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानाच्या सौंदर्यात कमालीचा भर पाडली आहे. हिलटॉप गार्डन परिसरात सायंकाळ च्या व रात्रीच्या सुमारास पट्टेदार वाघाचे खुले दर्शन होत असल्याचे वनव्यवस्थापन समितीचे सदस्य कोमल डोंगरवार यांनी सांगितले.

## वाळूमाफियांचा रामटेकच्या महिला एसडीओंवर हल्ला, तीन वाळू तस्करांना अटक



**नागपूरः–** वाळूमाफियांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत आहे. या मुजोर वाळूमाफियांना वेसण घालण्यास गेलेल्या महसूल अधिकाऱ्यांवर हल्ला चढविण्याच्या घटनांत दिवसेंदिवस वाढ होत आहे. जिल्ह्याच्या रामटेक तालुक्यात विनारॉयल्टी वाळू वाहतुकीला आळा घालण्यासाठी गेलेल्या रामटेकच्या महिला उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांच्या वाहनावर वाळूमाफियांनी हल्ला करीत अपघात घडविण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली असून याप्रकरणी तीन मुजोर तस्करांना अटक करण्यात आली आहे.

तुमसरहून रामटेकच्या दिशेने वाळूचे २५ ते ३० ट्रक येत असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली होती.त्यानंतर उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांनी दोन पथके तयार करुन ट्रक पकडण्यासाठी या मार्गावर मोर्चेबांधणी केली. त्यांना MH४०/LT ८८९६, MH३४/BG ४४१४, MH४०–/CM८ ७८८, MH३४/BH ४७४८, MH ४०/CM ०१८४, MH४०/BF ५५२१ आणि MH४०/AK ७९८९ क्रमांकांच्या सात वाहनांमध्ये दहा ब्रास वाळू आढळून आली. त्यामुळे अधिकाऱ्यांनी सर्व टिपर लगेच ताब्यात घेत रामटेक तहसील कार्यालयाच्या आवारात जमा केले. या धावपळीत MH ४०/AK ६५४६ क्रमांकाचा टिपर घोटीटोक येथून भंडारा मार्गानी पळून जात असताना वंदना सवरंगपते यांनी त्याचा पाठलाग सुरू केला.

टिपरमधील एकाने त्यांना हातोडा दाखवून घाबरविण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी MH ४९/B ६६१६ क्रमांकाची नॅनो कार दोन्ही वाहनांच्यामध्ये आली. नॅनो कारमुळे वंदना सवरंगपते यांना पुढे जाता येत नव्हते. त्यांच्या वाहनाला अपघात व्हावा, म्हणून समोर असलेल्या टिपरमधील वाळू रोडवर टाकली. रोडवर वाळू पसरताच नॅनोसह टिपर पळून गेला. सुदैवाने अधिकारी थोडक्यात बचावल्या.

एसडीओंनी विनारॉयल्टी वाळू वाहतुकीचे सात ट्रक जप्त केले. वंदना सवरंगपते यांच्या तक्रारीवरुन रामटेक पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपींचा शोध सुरू केला. या घटनेला नागपूर ग्रामीण पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी गांभीर्याने घेतले. त्यांनी तातडीने स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमला कामाला लावले. पोलिसांनी रात्री उशिरा तीन आरोपींना अटक केली.

टिपरचालक जोगेश्वर हरिदास यादव (वय ३५, रा. पारडी, नागपूर), कारचालक मोनू कादर खान (वय ३४) व विष्णू चंद्रप्रकाश मिश्रा (वय ३३, दोघेही रा. खरबी, नागपूर) या तिघांना नागपुरातून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून नॅनो कार व टिपर जप्त करण्यात आला आहे.

## चिल्हाटी येथे सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण



**देवरी:** तालुक्यातील चिल्हाटी येथे गेल्या बुधवारी दिशा सहाय्यता समूह (बचत गट) यांचे वतीने क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण व उमेद महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण व महिला मेळाव्याचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य उषा शहरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी चिल्हाटीच्या सरपंच पुस्तकला मरई, उपसरपंच रामजी हिरवाणी व सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच पोलिस पाटील गुमान कुवरदादरा, गाव पाटील देवानंद सेवता, अंगणवाडी सेविका पंचवती कौशल, पार्वती सोनढाण, तंटामुक्ती समिती अध्यक्ष मुनिंद्र कौशल, उन्नती महिला ग्राम संघ अध्यक्ष तोमिन कारत कुवरदादरा, उमेद कार्यकर्ता दुलेश्वरी कोमल रणढाफडा, राजकुमारी टेंभुरकरर, अनिता सेवता,प्रीती शिरभटये, हिरमत कुवरदादरा यांच्यासह उन्नती महिला ग्राम संघाचे सर्व महिला सदस्य व कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते

## गोंदिया जिल्हा व तालुक्याची लोककला सेवा मंडळ (ऑल इंडिया) ची कार्यकारिणी गठीत



**गोंदियाः** तालुक्यातील जि.प. भारतीय विद्यालय एकोडीच्या सभागृहात गोंदिया जिल्हा लोककला सेवा मंडळ (ऑल इंडिया) ची सभा जं.का.से.स.संस्था पुणेचे कार्यकारी संचालक राजेश कटरे यांच्या अध्यक्षतेत पार पडली. या सभेत लोककला मंडळाची जिल्हा व तालुका कार्यकारीणी गठित करण्यात आली. यावेळी माजी सरपंच रविकुमार पटले, पंचायत समिती सदस्य अजाबराव रिनायात, उमेश भांडारकर, माजी उपसरपंच किरण मेश्राम प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. लोककला सेवा मंडळाच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकून मंडळाच्या कार्याला समोर नेण्यासाठी आपण काय काय केले पाहिजे याविषयी विस्तृत अशी माहिती लोककला सेवा मंडळाचे गोंदिया जिल्हा अध्यक्ष संजय कटरे यांनी दिली. महिला अध्यक्ष सौ.लीलावती रहांगडाले यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. सभेला ११० कलावंतांनी उपस्थिती दर्शविली. सूत्रसंचालन गोंदिया जिल्हा महासचिव संजय पारधी यांनी केले. आभार निताताई पटले यांनी मानले.

या बैठकीत जिल्हा कार्यकारीणीची निवड करण्यात आली,त्यामध्ये झेड.डी. पटले उपाध्यक्ष, निताताई पटले महिला उपाध्यक्ष, बी.यु.बिसेन प्रसिद्धी प्रमुख तर गोंदिया तालुका अध्यक्ष जगदीश पटले, वीरेंद्र चन्ने महासचिव, हेतराम सोनेवाने–उपाध्यक्ष, छन्नू चौधरी–उपाध्यक्ष, माणिक चौधरी–उपाध्यक्ष, किरण मेश्राम प्रसिद्धी प्रमुख, रामदयाल बघेले– सहसचिव, श्रीमती श्यामवती परिहार महिला अध्यक्ष, माया पारधी महिला उपाध्यक्ष, श्रीमती बिरजबाई मेश्राम–महिला उपाध्यक्ष, आरती पटले–महिला सहसचिव, उषाताई मेश्राम महिला सहसचिव, सविता रहांगडाले–महिला उपाध्यक्ष यांचा समावेश आहे. तिरोडा तालुका अध्यक्ष जे.आर.पटले, प्रल्हाद ठाकरे महासचिव, झनक रहांगडाले उपाध्यक्ष, धर्मेंद्र बोपचे उपाध्यक्ष, दौलतसिंह हरिनखेडे कोषाध्यक्ष, जयप्रकाश बिसेन सहसचिव यांची निवड करण्यात आली.

## ककोडी येथे भक्तिमय वातावरणात रक्तदान

**ककोडी:–** देवरी ताालुक्यातील ककोडी येथे सतत ११ वर्षापासुन चालत आलेल्या परंपरेला कायम ठेवत येथील श्री बजरंग मानस महोत्सव मंचच्या वतीने तिन दिवसीय (रामायण) मानस महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच भक्तिमय वातावरणात रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

तिन दिवसीय मानस टिका (रामायण) सोबत रक्तदान, आयुष्यमान कार्ड, उज्वला योजनेचा KYC., तसेच दंन्त आरोग्य शिबिराचे आयोजन घेण्यात आले.

या शिबिराच्या माध्यमातून गावकरी तसेच ककोडी क्षेत्रातील नागरिकांना ऐकाच मचांवर विविध जनकल्याण योजनेचा फायदा मिळाला. महत्त्वाचे म्हणजे मानस महोत्सवाच्या माध्यमातून रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने रक्तदात्यानी रक्तदान केले.



## धाराशिवमध्ये २४ जानेवारीला ओबीसी महाएल्गार मेळाव्याचे आयोजन–सलगर

### छगन भुजबळ, प्रकाश आंबेडकर यांच्यासह २० नेते उपस्थित राहणार




**धाराशिव:** ओबीसीचे आरक्षण आजपर्यंत पूर्णपणे मिळालेले नाही. ओबीसींच्या ४०० पेक्षा जास्त जाती असताना केवळ २७ टक्के आरक्षण दिले गेले आहे. ते देखील संवैधानिक नाही. त्यामुळे या समूहाला आरक्षणाचा लाभ मिळण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत. ओबीसींमध्ये आरक्षणाची जनजागृती व्हावी व सरकारने या प्रवर्गांना न्याय द्यावा यासाठी धाराशिव शहरात दि.२४ जानेवारी रोजी ओबीसी महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अर्जुन सलगर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दि.१५ जानेवारी रोजी दिली. दरम्यान या मेळाव्यास मंत्री मा. छगन भुजबळ, मा. प्रकाश आंबेडकर, मा.प्रकाश( अण्णा ) शेंडगे, आ.गोपीचंद पडळकर, मा. टि.पी.मुंडे सर, चंद्रकांत बावकर (कुणबी मराठा नेते), तांडेल(आग्री समाज नेते) कल्याण दळे, लक्ष्मण गायकवाड डॉ.बी.डी. चव्हाण (बंजारा नेते) यांच्यासह मोठ्या संख्येने नेते मंडळी येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अॅड खंडेराव चौरे, सचिन शेंडगे, पोपट माळी, अरुण जाधवर, कल्याण कुंभार, उमेश मोराळे, बप्पा कोरे, दिपक जाधव, संतोष चौगुले, नामदेव वाघमारे, दिलीप म्हेत्रे, शेषेराव चव्हाण, बालाजी वगरे, सुनिल कानडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना सलगर म्हणाले की, ओबीसी महाएल्गार मेळाव्यासाठी मंत्री छगन भुजबळ, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख अॅड. प्रकाश आंबेडकर, आ गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, टि.पी.मुंडे, कल्याणराव दळे, लक्ष्मण गायकवाड यांच्यासह इतर २० नेते उपस्थित राहणार आहेत.

ओबीसी आरक्षणासाठी राज्यभरात सकल ओबीसी समाजाच्या माध्यमातून जनजागृती मेळावे घेण्यात येत आहेत. त्याच धर्तीवर धाराशिव शहरात देखील हा मेळावा घेण्यात येणार असून यासाठी २ लाख ओबीसी बांधव उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारला ओबीसींच्या हक्काचे आरक्षण देण्यासाठी भाग पाडण्यात येणार आहे. ओबीसींच्या आरक्षणाला संविधानिक दर्जा दिलेला नसल्यामुळे तो देण्यात यावा. विशेष म्हणजे केंद्र सरकारने जिल्हा परिषद नगरपरिषद ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये असलेले ओबीसींचे आरक्षण रद्द केले असून ते पूर्ववत देण्यात यावे अशी मागणी ही त्यांनी केली.

## गुमडोह महादेव पहाडीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणार–जितेन्द्र कटरे



**गोरेगांव:** सहारवाणी जिल्हा परिषद क्षेत्रातील गुमडोह हे क्षेत्र आदिवासी बांधवांच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे असून या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आपण आवश्यक ते सर्व प्रयत्न आपण करणार, असे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य व ओबीसी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष जितेंद्र कटरे यांनी केले.

तालुक्यातील नवरगांव येथील गुमडोह पहाडी येथे मकरसंक्रांति निमित्त दि.१४ जनवरी २०२४ रोजी आदिवासी विकास मण्डल नवरगांव, सुकपूर यांच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

सुरुवातीला भगवान महादेव यांची पूजा अर्चना करुन आदिवासी साकृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन जिला परिषद सदस्य तथा गोंदिया जिला कांग्रेस कमेटी ओबीसी विभाग अध्यक्ष जितेंद्रभाऊ कटरे यांच्या अध्यक्षतेखाली तिरोडा विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ राहंगडाले यांच्या हस्ते करण्यात आले.

पुढे बोलताना जितेंद्र कटरे यांनी आदिवासी या देशाचा मूलनिवासी असून जल, जंगल, जमीनीच्या रक्षा करण्यासाठी आदिवासी समाज सदैव अग्रेसर राहत असून इतरांनी त्यांचेकडून शिकण्याची गरज असल्याचे सांगितले. यावेळी आमदार विजय रहांगडाले यांनीही समयोचीत मार्गदर्शन केले व आपल्या निधीतून १० लाख सभामंडपासाठी देणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे, राष्ट्रवादी कांग्रेस युवा नेता रविकांत बोपचे, कुऱ्हाडी जिल्हा परिषद सदस्य शैलेश नंदेश्वर, गोरेगांव पंचायत समिती उपसभापति राजकुमार यादव, गोंदिया शहर कांग्रेस अध्यक्ष जहिरभाई अहमद, कुऱ्हाडी पंचायत समिति सदस्य गणवीरताई, ग्राम पंचायत चिचगांव सरपंच भूमेश्वरीताई राहांगडाले, बोरगांव ग्राम पंचायत सरपंच चोपकरताई, तंटामुक्त समिती अध्यक्ष अशोक शेंडे, तुलसी मेश्राम, जगदीश मेश्राम, विनोद ठाकुर, उपसरपंच रमेश ठाकुर, माजी सरपंच दिनेश परतेती आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक दिनेश परतेती, संचालन अशोक शेंडे, व आभार प्रदर्शन जगदीश मेश्राम यांनी केले. कार्यक्रमानंतर जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र कटरे यांच्या हस्ते सार्वजनिक शौचालयाचे भूमिपूजन करण्यात आले.

## प्रफुल्ल पटेल भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यास सज्ज



**भंडारा :** एकीकडे राज्यात सर्वत्र महायुतीच्या जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळाव्यासाठी महायुतीतील तीनही पक्षांचे नेते एकत्र येत असून जागा वाटपात पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील तो मान्य, असे सांगत आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल हे मात्र भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यास सज्ज असल्याचे दिसून येत आहे. तीनही पक्षाचे प्रमुख एकत्रितपणे हा निर्णय घेतील असे बोलतानाच भंडारा–गोंदिया मतदार संघातून लढण्याचा निर्णय घेतल्यास आम्हाला तयारीची गरज नाही असेही ते म्हणाले. त्यामुळे या मतदासंघावर आता अजित पवार गट दावा ठोकणार का अशा चर्चांना ऊत आलेला आहे.

या मतदारसंघातून मी अनेक वर्ष खासदार म्हणून निवडून आलो आहे. या मतदार संघात राष्ट्रवादी नेहमीच मजबूत राहिली आहे. आमचा पक्ष विदर्भात विशेषतः भंडारा गोंदिया मतदारसंघात सर्वाधिक बळकट आहे. त्यामुळे ती जागा आणि मागितल्यास त्यात काहीच वावगे ठरणार नाही. शिवाय या मतदार संघात मी अनेक कामे केली आहेत, प्रतिनिधीत्व केलं त्यामुळे माझ्या तयारीचा प्रश्नच उरत नाही. मी सदैव तयार असतो. विदर्भात आम्हाला जागा हव्या आहेत असेही ते म्हणाले. प्रफुल्ल पटेल म्हणाले की, भंडारा जिल्हा मतदारसंघ आणि माझं नातं वेगळा आहे. विदर्भात सगळ्यात बळकट राष्ट्रवादी ही गोंदिया भंडारा जिल्ह्यात आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे ही राष्ट्रवादीला मिळणे अपेक्षित आहे. मी भंडारा–गोंदियासाठी आग्रह केलेला नाही पण जेव्हा तयारीची गोष्ट करता ३६५ दिवस गोंदिया–भंडाऱ्याच्या संपर्कात असतो. त्यामुळे त्यासाठी मला वेगळं काम करण्याची गरज नाही.

# लोकसभेला ११ लाख मतदार आता बजावणार हक्क

## २२ जानेवारी रोजी अंतिम मतदार यादी होणार प्रसिद्ध: मतदारांचा आकडा येईल समोर

**गोंदिया:** लोकसभा निवडणुका फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी किंवा मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्याता जाहीर होऊ शकतात. जिल्ह्यात १० लाख ९६ हजार ४५९ मतदार असून नवमतदारांची संख्या १३ हजार ८२७ एवढी आहे. हे सर्व मतदार आगामी निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजा–वतील. परंतु नवीन मतदारांचे मतदान महत्वाचे ठरणार आहे.





जिल्ह्यात ५ जानेवारीपर्यंत नवमतदारांची नोंदणी करण्यात आली. आता २२ जानेवारी रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यामध्ये आतापर्यंत नोंदणी केलेल्या नवीन मतदारांचा समावेश असणार आहे. नवीन मतदारांचा नोंदणीसाठी चांगला प्रतिसाद राहीला. प्रत्यक्ष नोंदणी किती जणांनी केली हे अंतिम मतदार यादीनुसार समजून येणार आहे.

१८ वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांनी मतदार नोंदणी केली आहे. वर्षभरात मतदार म्हणून नाव नोंदविण्यासाठी चार संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. त्या कालावधीत होणाऱ्या विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमामध्ये अर्ज क्रमांक सात भरुन आगऊ मतदार म्हणून नोंदणी करण्यात आली आहे.

मागील वर्षभराच्या कालावधीत मतदार नोंदणीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे मतदारांमध्ये वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे. अंतिम मतदार यादी २२ जानेवारी रोजी जाहीर होणार असल्याने एकूण मतदारांचा आकडा समोर येणार आहे. यातून नवमतदारांची संख्याही वाढणार आहे.

### जिल्ह्यातील मतदार

**पुरुष मतदार–५,४५,९०२**
**स्त्री मतदार–५,५०,५४८**
**अर्जुनी मोरगाव मतदार संघ (६३)**
**पुरुष मतदार–१,२७,४८१**
**स्त्री मतदार–१,२५,२९४**
**तिरोडा मतदारसंघ (६४)**
**पुरुष मतदार–१,३०,९६३**
**स्त्री मतदार–१,३३,३९९**
**गोंदिया मतदारसंघ (६५)**
**पुरुष मतदार–१,५३,३८२**
**स्त्री मतदार–१,३४,२०२**
**आमगाव मतदारसंघ (६६)**
**पुरुष मतदार–१,३४,०७६**
**स्त्री मतदार–१,३४,२०२**

### जिल्ह्यात ११ लाख मतदार

**२२ जानेवारी रोजी अंतिम मतदार संख्या जाहीर होणार आहे. जिल्ह्यात १० लाख ९६ हजार ४५१ मतदार आहेत. अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यावर मतदारांच्या संख्येत थोडाफार फरक होऊ शकतो.**

### आकडा आणखी वाढणार

**येत्या २२ जानेवारी रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. यामुळे सध्या १० लाख ९६ हजार ४५९ मतदार असले तरी मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यात आणखी वाढ होणार आहे.**

### १३ हजार नवमतदार पहिल्यांदाच बजावणार हक्क

**जिल्ह्यात चार विधानसभा मतदारसंघातील नवमतदारांनी नोंदणी केली. त्यानुसार जिल्ह्यात नवमतदारांची संख्या १३ हजार ८२७ असून ते पहिल्यांदाच आगामी लोकसभा निवडणुकीत आपला मतद–ानाचा हक्क बजावणार आहेत.**

### ७,५१७ मतदार सारख्या चेहऱ्यांचे

**लोकसभा निवडणुकीला घेऊन जिल्हा प्रशासनाकडून तयारीला सुरुवात झाली आहे. यासाठी मतदार विभाग सज्ज झाले असून मतदार यादीचे कामही सुरु आहे. यातच जिल्ह्यात ७,५१७ मतदार सारख्या चेहऱ्याचे आढळून आले आहेत.**

# ग्रामसेवक हिंगेंच्या आत्महत्येची चौकशी करा

## ग्रामसेवक संघटनेची मागणी: कंत्राटदार, माहिती अधिकार कार्यक्त्यांवर रोष

**गोंदिया:** देवरी तालुक्यातील शिलापूर, डवकी ग्रामपंचायतमध्ये कंत्राटी पद्धतीवर कार्यरत ग्रामसेवक मोहन हिंगे यांनी नुकतीच आत्महत्या केली. त्यांच्यावर ाही माहिती अधिकार कार्यकर्ते आणि कंत्राटदार दबाव आणून कामे करुन घेत होते. शेवटी त्यांच्या या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली अस–ावी, असा संशय ग्रामसेवक संघटनेने व्यक्त केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी निवेदनातून केली आहे.

मोहन हिंगे कंत्राटी ग्रामसेवक म्हणून शिलापूर डवकी येथे कार्यरत होते. अनुकंपा ततवर त्यांना नियुक्ती देण्यात आली होती. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती हलाखीची असूनही घरात कोणताही वाद किंवा वैमनस्य नव्हते. अशास्थितीत त्यांच्या आत्महत्येमुळे शंकेला जागा आहे. या संदर्भात चर्चा केली असता देवरी पंचायत समिती अंतर्गत कार्यरत पदावर काही स्थानिक आरटीआय कार्यकर्ते मानसिक त्रास देऊन ब्लॅकमेल करीत असल्याचे तसेच काही स्थानिक अवैध ठेकेदार अवैध बिल काढण्यासाठी राजकीय दबाव टाकत असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे त्यांच्या आत्महत्येमागे काही आरटीआय कार्यकर्ते, स्थानिक कंत्राटदार किंवा पदाधिकारी कारणीभूत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मोहन हिंगे यांच्या भ्रमणध्वनीचे मागील एक महिन्याचे संभाषण प्राप्त केल्यास अनेक तथ्य समोर येऊ शकतात. याप्रकरणी लक्ष घालून त्वरित सखोल चौकशी करण्याचे निर्देश द्यावे, अशी मागणी गटविकास अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनच्यावतीने करण्यात आली.



**मोहन हिंगे कंत्राटी ग्रामसेवक यांची आत्महत्या दुदैवी आहे. ग्रामसेवक संवर्गावर सर्वच स्तरावरुन शासनाच्या योजना, विकास कामे, स्थानिक संस्थेची कामे, अधिकारी, पदाधिकाऱ्यांची कामे, लोकसेवा, विविध अभियानाचा प्रचंड ताण असून अनेक विपरित परिस्थिती हा संवर्ग काम करतो. अशात काही असामाजिक तत्व आरटीआई कार्यकर्ते, अवैध ठेकेदार, तसेच ठेकेदारी करणारे असामाजिक तत्व आरटीआई कार्यकर्ते, अवैध ठेकेदार, तसेच ठेकेदारी करणारे पदाधिकारी ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करतात. दबाव आणून नियमबाह्य कामे करायला भाग पाडतात. त्यामुळे अशा दुदैवी घटनांचे प्रकार वाढले आहे. या विषयाची सखोल चौकशी करुन जवाबदार दोषींवर त्वरित कारवाई करुन हिंगे कुटुंबांना न्याय द्यावा.**

**कमलेश बिसेन**
**जिल्हाध्यक्ष, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी युनियन**

# बँक लॉकर्सचे नियम बदलले; तुम्ही करार अपडेट केला का?



**गोंदिया:** चोरी, घरफोडी, दरोडा आदींपासून दागिने व रोकड सुरक्षित ठेवण्यासाठी आता बहुतांशजण बँक लॉकर्सचा पर्याय अवलंबताना दिसून येत आहेत.

नव्या वर्षात आरबीआयने बँकेतील लॉकर्सचे नियम बदलले आहेत. त्यानुसार लॉकर्सधारकांना बँकेशी करार अपडेट करुन घेणे आवश्यक आहे. सध्याच्या डिजिटल युगात बरेचजण पैसे घरात ठेवणे पसंत करत नाहीत. त्यासाठी बँकेच्या लॉकर्स सुविधेची निवड करण्यात येते. त्यामुळे आता प्रत्येक शासकीय बँकेत विविध प्रकारचे लॉकर्स ग्राहकांना उपलब्ध करुन देण्यात येतात. ग्राहकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आरबीआयकडून नव्या वर्षापासून बदल करण्यात आले आहेत.

### बँक लॉकर्सचे हे नियम बदलले

**लॉकरमध्ये ठेवलेले सामान खराब झाल्यास बँकेला संबंधित ग्राहकाला लॉकरसाठी आकारण्यात येणाऱ्या भाड्याच्या शंभर पट रक्कम द्यावी लागेल.**

### अनेक ग्राहकांनी बदलला करार

**आरबीआयने १ जानेवारी २०२४ पासून केलेल्या नव्या नियमांनुसार अनेक ग्राहकांनी कराव बदलला आहे. तर बहुतांशजण बँकेत जाऊन करार बदलत आहेत.**

### शहरात २०० बँकांचे हजारो लॉकर्स

**गोंदिया जिल्ह्यात सर्व बँकेच्या विविध शाखांच्या जवळपस २०० बँक आहेत. या बँकामध्ये श्रेणी एक, दोन, तीन असे विविध प्रकारचे लॉकर्स आहेत. त्यामुळे जवळपास हजारो लॉकर्स असल्याची माहिती आहे. अनेकजण या लॉकर्सचा वापर करीत आहेत.**

### तर लॉकर्सधारकांना नुकसान भरपाई

**बँकेवर दरोडा पडला किंवा बँकेतून काही मौल्यवान वस्तू गहाळ झाल्या तर त्याची भरपाई बँकेला द्यावी लागणार आहे.**
**बँकेला आग लागली तर बँकेला लॉकर्सधारकांना नुकसनभरपाई देणे बंधनकारक करण्यात आले आहे.**

# प्रोग्रेसिव्ह ग्रुप ऑफ स्कूल्सचा वार्षिकोत्सव थाटात



**गोंदिया:** येथील प्रोग्रेसिव्ह ग्रुप ऑफ स्कूल्स अंतर्गत प्रोग्रेसिव्ह कॉन्व्हेंट, प्रोग्रेसिव्ह इंग्लीश स्कूल, प्रोग्रेसिव्ह इंटरनॅशनल स्कूल, प्रोग्रेसिव्ह मराठी स्कूल, प्रोग्रेसिव्ह हिंदी स्कूलचा वार्षिकोत्सव नुकताच थाटात पार पडला. या वार्षिकोत्सवातून विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंगी असलेल्या कलांना सादर केले.

यवेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थाध्यक्ष डॉ.पंकज कटकवार, उपाध्यक्ष अल्का कटकवार, सचिव डॉ. निरज कटकवार, गुरुकुल कॉन्व्हेंटचे संस्थापक मुरलीधर माहोरे, सी.ए.गणेश रोडा, अमृता गायकवाड, प्राचार्य ओ.टी.रहांगडाले, कुमुदिनी तावाडे, वाय.आशा राव, मीनाक्षी महापात्रा, कुलदीप भौतिक, अभय गुरव, वीणा कावळे, निधी व्यास, कृष्णा चौहान, विकास पटले उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीची वास्तविकता दर्शवता विविध पारंपरिक नृत्य व नाटक सादर केले. डॉ. निरज कटकवार यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कार्यक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमासाठी रुपकला रहांगडाले, लीना रहांगडाले, सपना बिरखेडे, रानी खान, मोना खोकले, स्मिता शुक्ला, मीना सिंगनजुडे, अभिलाषा तिवारी, भुमेश्वरी गौतम, प्रेरणा सिंग, दुर्गा रामटेक्कर, रितेश येडे, सतीश मोटघरे, तुमेश पारधी, भानूलता लावेटी, राहुल रामटेके, दिव्यांशू जायस्वाल आदिंनी सहकार्य केले.

# सडक अर्जुनीचे नवे वनपरिक्षेत्र अधिकारी मिथुन तरोणे

**गोंदिया :** सडक अर्जुनी तालुक्याचे नवे वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून मिथुन देवचंद तरोने यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी दि.१० रोजी पदभार स्वीकारला आहे. वन परिक्षेत्र अधिकारी सुरेश जाधव यांचे निलंबन झाल्यानंतर प्रभारी म्हणून सचिन ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली होती.



भंडारा वन विभाग अंतर्गत येणारे साकोली, अड्याळ, पवनी अश्या विविध ठिकाणी वन परिक्षेत्र अधिकारी म्हणून परिविक्षाधीन कालावधीत कार्यरत होते. एक वर्षाचा कालावधी पार पडल्यानंतर सडक अर्जुनी येथे प्रथमच वन परिक्षेत्र अधिकारी म्हणून नियुक्त झाली आहे.


# ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी

## पंचायत समिती गोरेगाव, जिल्हा परिषद गोंदिया

निविदा सुचना–०३/२०२३–२४ दि.१३/०१/२०२३

ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद गोंदिया हे १५ वा वित्त आयोग अंतर्गत विविध बांधकामे तसेच जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा योजने अंतर्गत सिमेंट रस्ता बांधकाम करण्याकरिता ई–निविदा जि.प.बांधकाम विभाग गोंदिया कडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी पद्धतीने ऑनलाईन मागवित आहे. ई–निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १३/०१/२०२३ पासून उपलब्ध आहे.

**ई-निविदा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | ई–निविदा प्रसिद्धी व दाखल दिनांक | दिनांक १३/०१/२०२३ पासून |
| २ | ई–निविदा अंतिम दिनांक | दिनांक २२/०१/२०२३ ला.१२ वा.पर्यंत |
| ३ | ई–निविदा उघडण्याची दिनांक | दिनांक २३/०१/२०२३ ला. १२.०० वा.शक्य झाल्यास |

विस्तृत माहिती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वांना लागू राहतील.

**सरपंच** ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी

**ग्रामसेवक** ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी


# जिल्हास्तरीय पौष्टिक तृणधान्य शेतकरी शास्त्रज्ञ चर्चासत्र संपन्न

**गोंदिया:** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गोंदिया, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व महिला आर्थिक विकास महामंडळ यांचे संयुक्त वतीने जिल्हास्तरीय पौष्टिक तृणधान्य शेतकरी शास्त्रज्ञ चर्चासत्राचे आयोजन १४ जानेवारी २०२४ रोजी मोदी मैदान, बालाघाट टी पॉईट जवळ, गोंदिया येथे करण्यात आले होते.

गोंदिया जिल्ह्यात पारंपारिक भात पिकाला पर्याय म्हणून ज्वारी, बाजरी, नाचणी, राजगिरा, वरई इत्यादी पौष्टिक तृणधान्याचे क्षेत्र वाढावे या दृष्टिकोनातून सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राला उद्घाटक म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण उपस्थित होते. यावेळी प्रकल्प संचालक आत्मा अजित अडसुळे, माविमचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. सय्यद शाकीर अली वरिष्ठ संशोधक कृषी विज्ञान केंद्र गोंदिया, डॉ. तेजेश्वरी टेंभरे प्राध्यापिका एस. एस. गर्ल्स कॉलेज, डॉ. प्राजक्ता डोंगरवार आहारतज्ञ सहयोग रुग्णालय गोंदिया, डॉ. ईश्वरी खटवानी प्राध्यापक एस. एस. गर्ल्स कॉलेज गोंदिया उपस्थित होते.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी उपस्थित शेतकऱ्यांना कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या पौष्टिक तृणधान्याच्या लागवडीबाबत सविस्तर माहिती दिली. प्रकल्प संचालक आत्मा अजित आडसुळे यांनी पौष्टिक तृणधान्य वर्ष साजरा करण्यामागे काय उद्दिष्टे आहेत व आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य संकल्पना काय आहे याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. सय्यद शाकीर अली यांनी उपस्थित शेतकऱ्यांना भात पिकाला पर्याय म्हणून ज्वारी, बाजरी, नाचणी, कसे फायदेशीर आहे व त्यांचे लागवड तंत्रज्ञान याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. तेजेश्वरी टेंभरे यांनी ज्वारी, बाजरी, नाचणी, कोदो, कुटकी इत्यादी धान्यांपासून चविष्ट व सकस पदार्थ कसे तयार करावेत याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला उपस्थित डॉ. प्राजक्ता डोंगरवार आहारतज्ञ सहयोग रुग्णालय गोंदिया यांनी उपस्थित महिला व पुरुष शेतकऱ्यांना दैनंदिन आहारामध्ये पौष्टिक तृणधान्यांचा समावेश करणे का गरजेचे आहे व मानवी आरोग्य सुदृढ राहण्यासाठी ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई यांचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी अधिकारी पवन मेश्राम यांनी केले. सूत्रसंचालन करुन उपस्थितांचे आभार मंडळ कृषी अधिकारी सालेकसा नंदू वानखेडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा सल्लागार भारत गोंडाने, नूतन कटरे, रिजवान शेख, अनिता उके, कुंजलता भुरकुटे, पुष्पा कावरे, महेंद्र दिहारे, नरेश हरीणखेडे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील शेतकरी बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# पौष्टिक तृणधान्य पाककला स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद



**गोंदिया:** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गोंदिया, प्रकल्प संचालक आत्मा व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पौष्टिक तृणधान्य आधारित पाककला स्पर्धेचे आयोजन १४ जानेवारी २०२४ रोजी मोदी मैदान, गोंदिया येथे करण्यात आले होते.

दैनंदिन मानवी आहारामध्ये पौष्टिक तृणधान्य जसे–ज्वारी, बाजरी, नाचणी, कुटकी, राजगिरा इत्यादी पौष्टिक धान्यांचा समावेश व्हावा, पौष्टिक तृणधान्यांपासून तयार होणाऱ्या पदार्थांना प्रोत्साहन मिळावे या दृष्किोनातून सदर पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेमध्ये विविध बचत गटांच्या महिलांनी तसेच इतरही महिला स्पर्धकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. स्पर्धेमध्ये महिलांनी ज्वारी, बाजरी, नाचणी, कुटकी, राजगिरा इत्यादी तृणधान्यांपासून तयार होणारे विविध पदार्थ जसे–ज्वारीचे लाडू, बाजरीची खीर, बाजरीची भाकरी, चकली, थालीपीठ, चीला, वडे, इडली, पराठे इत्यादी पदार्थ तयार करून स्पर्धेमध्ये ठेवले होते. स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांसाठी प्रथम बक्षीस तीन हजार रुपये, द्वितीय बक्षीस दोन हजार रुपये व तृतीय बक्षीस एक हजार रुपये याप्रमाणे बक्षीसे ठेवण्यात आलेली होती.

स्पर्धेला परीक्षक म्हणून डॉ. तेजेश्वरी टेंभरे प्राध्यापिका एस.एस.गर्ल्स कॉलेज, डॉ. ईश्वरी खटवानी गोंदिया, डॉ. प्राजक्ता डोंगरवार आहारतज्ञ सहयोग रुग्णालय गोंदिया या लाभल्या होत्या. परीक्षकांनी सर्व स्टॉल्सला भेटी देवून महिलांनी तयार केलेल्या पदार्थांची चव घेऊन स्पर्धेचे परीक्षण करुन निकाल जाहीर केला. यामध्ये चारुशीला भांडारकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, मिनाक्षी बागडे यांनी द्वितीय क्रमांक तर दुर्गा वर्मा यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.

विजेत्यांना परीक्षक म्हणून लाभलेल्या डॉ. तेजेश्वरी टेंभरे, डॉ. प्राजक्ता डोंगरवार, डॉ. ईश्वरी खटवानी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, प्रकल्प संचालक आत्मा अजित आडसुळे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर यांच्या हस्ते बक्षीसे व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व महिलांना प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी पवन मेश्राम कृषी अधिकारी गोंदिया, तालुका कृषी अधिकारी महेंद्र दिहारे, राजेश पवार, नंदू वानखेडे मंडळ कृषी अधिकारी सालेकसा, महिला आर्थिक विकास महामंडळाचे सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी सतीश मार्कंड उपस्थित होते.


NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, गोंदिया

बेटी बचाओ save the girl child

## सिकलसेल पिअर सपोर्ट/एक्युकेटर पदाकरिता जाहीरात सन २०२३-२४

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या सिकलसेल कार्यक्रमाकरीता जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, जि.प.गोंदिया अंतर्गत मानधन तत्वावर Sickle cell peer Support पदाच्या भरती करीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर पद हे तालुकास्तरावरील असून एकूण ८ पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहे. सदर पदाकरीता आवश्यक अटी व शर्ती, अर्जाचा नमुना संपूर्ण माहिती जिल्हा परिषद, गोंदिया या संकेत स्थळावर www.zpgondia.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर पदांकरीता अर्ज स्विकारण्याची **अंतिम तारीख २३/०१/२०२४** पर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत करण्यात येणार नाही. सदर अर्ज हे राष्ट्रीय आरोग्य अभियान, पतंगा मैदान, फुलचूर, आमगांव रोड, गोंदिया कार्यालयात सादर करण्यात यावे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सचिव** जि.ए.आ.कु.कं.सोसायटी गोंदिया.

**अध्यक्ष** जि.ए.आ.कु.कं.सोसायटी गोंदिया.



# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

## कार्यकारी अभियंता गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया

(ई–मेल : gidgondiasdb@refiffmail.com दुरध्वनी क्र.०७१८२–२३७०७७

## ई-निविदा सुचना क्र.०६/गोपावि/२०२३-२४ (दुसरी वेळ)

कार्यकारी अभियंता, गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया ता.जि.गोंदिया ह्यांचे कार्यालयाकडून खालील कामाकरिता ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatender.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. तसेच संपूर्ण निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा अंदाजित किंमत रू. | इसारा/ बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | Estimate of Cleanning Gross,Removing Silt and Repairing Outlats @ RD 0m to 2000m of Main Canal of Chulband Medium Project at Village Murdoli Tah.Goregaon Dist.Gondia | रू.७,९१,९८३/– | रू.८,०००/– | रू.१,१८०/– (जीएसटीसह) | वर्ग–७ व त्यावरील | ६ महिने |

अ) निविदा विक्री कालावधी :–१५.०१.२०२४ ते दि.२५.०१.२०२४ वेळ १४.०० वाजे पर्यंत
ब) निविदा सादर करण्याचा शेवटचा दिनांक :–२५.०१.२०२४ वेळ १४.०० वाजे पर्यंत
क) Geo Tagging करण्याकरिता कामाचे ठिकाणी भेट देण्याचा :– दि.१७.०१.२०२४ ते दि.२३.०१.२०२४ (१४.०० वाजे पर्यंत)
ड) निविदा उघडण्याच कालावधी :– दि.२९.०१.२०२४ वेळ १५.०० वाजेपासून
(सदर निविदे सुचनेत काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

१) कंत्राटदाराने Geo Tagging Certificate हे लिफाफा क्र.१ मधून सादर /Upload करने अनिवार्य आहे. अन्यथा सदर कंत्राटदाराची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.
२) निविदा मागविणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी कंत्राटदारांची क्षेत्रिय भेट प्रभावी असावी यासाठी कार्यस्थळाच्या भेटीसाठी किमान ३ जिओॲगिगं साईटचे स्थान निश्चित केले आहे.
३) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई–निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
४) सविस्तर ई–निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रानिक टेन्डर management https://mahatender.gov.in तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीसबोर्डावर पहावयास मिळेल.
५)या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमापे नकाशे ई.कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. निविदादार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास जवाबदार राहतील. आणि याकरिता कोणताही प्रकारचे दावे (Claims) निविदाकारास देय राहणार नाही.
६) उपरोक्त कामाची दोष निवारण कालावधी ५ वर्ष राहील.

**(एस.एस.सोनुले)**
कार्यकारी अभियंता
गोंदिया पाटबंधारे विभाग
गोंदिया

# शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरुन आपले जीवनमान उंचवावे-आमदार चंद्रिकापुरे

**गोंदिया :** भारत हा कृषी प्रधान देश आहे. सद्याच्या परिस्थितीत वातावरणीय बदलामुळे कधी ओला दुष्काळ तर कधी दुष्काळ अशी सद्या परिस्थिती असल्यामुळे शेतकऱ्यांना पाहिजे त्या प्रमाणात शेतीतून उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरुन आपले जीवनमान उंचवावे, असे प्रतिपादन आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी आज येथे केले.



कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ, गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने मोदी मैदान, गोंदिया येथे आयोजित जिल्हास्तरीय कृषी व पौष्टिक तृणधान्य महोत्सव कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करतांना श्री. चंद्रिकापुरे बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांचे हस्ते करण्यात आले. आमदार विनोद अग्रवाल, जि.प.बांधकाम व अर्थ समिती सभापती संजय टेंभरे, समाज कल्याण समिती सभापती पुजा सेठ, पं.स.सभापती मुनेश्वर रहांगडाले, उपवनसंरक्षक श्री. बोंबार्डे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, प्रकल्प संचालक (आत्मा) अजित आडसुळे, माविमचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर, कृषी विज्ञान केंद्र हिवरा चे प्रमुख सय्यद शाकीर अली यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

आमदार श्री. चंद्रिकापुरे म्हणाले, गोंदिया जिल्ह्यात मुख्यत्वे धान पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. शेतकऱ्यांनी शेती करीत असतांना पारंपारिक शेतीला फाटा देत इतरही शेतीपुरक पिके घेणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील शेतकरी सुखी व समृध्द कसे होतील याकडे जिल्हा प्रशासनाने विशेष लक्ष दयावे. उत्पन्न घेतांना कोणत्या पध्दतीने शेती करुन जास्तीत जास्त नफा मिळेल याबद्दल कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उद्योजकाकडे वळावे. शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध करुन दयावी, जेणेकरुन शेतकरी सुजलाम सुफलाम होईल यावर भर देण्यात यावा. महिला बचत गटाला माविम व उमेदने कौशल्यावर आधारित प्रशिक्षण दयावे. शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेवून आपले जीवनमान उंचवावे. जिल्ह्यात स्मार्ट प्रकल्प देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, आपला देश हा कृषी प्रधान देश आहे. देशात ५० टक्के नागरिक शेतकरी आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे यासाठी कृषी विभागाने विशेष प्रयत्न करावे. इजराईल देशात जशी शेती केली जाते, तशी शेती आपल्या देशातील शेतकऱ्यांनी केली तर भारतातील शेतकरी सुखी व समृध्द होतील. शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेती करावी, यासाठी शेतकऱ्यांनी समयसुचकता पाळावी. शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेवून आपले आर्थिक स्त्रोत उंचवावे. प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास अशक्य असे काहीच नाही. महिला बचत गटाच्या उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यास आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### बचत गट निर्मित वस्तूंचे स्टॉल

**महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गट निर्मित वस्तूंचे स्टॉल या प्रदर्शनाचे आकर्षण आहे. विविध वस्तू व धान्याची या स्टॉलवर प्रदर्शन व विक्री होत आहे. तसेच शेती उपयोगी साहित्य सुद्धा याठिकाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. नागरिकांसाठी खाद्य पदार्थांचे स्टॉल आहेत. या ठिकाणी येऊन खाद्य पदार्थांचा आस्वाद घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

जिल्हाधिकारी श्री. गोतमारे म्हणाले, गोंदिया जिल्ह्याची संपुर्ण महाराष्ट्रात राईस सीटी म्हणून ओळख आहे. तसेच जिल्ह्याची धानाचे कोठार म्हणून सुध्दा ओळख आहे. शेतकऱ्यांनी केवळ धानाच्या उत्पादनावर भर न देता शेतीपुरक तृणधान्याचे पीक सुध्दा घेण्यात यावे. शेतीला जोडधंदयाची उत्पादने जसे-मशरुम, हळद पीक घेण्यात यावी. परिसंवाद चर्चासत्रात शेतकऱ्यांच्या काय मागण्या आहेत, त्यांच्या काय समस्या आहेत यावर कृषी विभागाने भर दयावा. शेतीला दुग्ध उत्पादनाची जोड देण्यात यावी. शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त उत्पादन कसे वाढेल यावर कृषि विभागाने विशेष भर दयावे. धान पिकाला फाटा देत तेल बियाणांचेही उत्पादन जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घ्यावे असे त्यांनी सांगितले.

यावेळी जि.प.बांधकाम व अर्थ समिती सभापती संजय टेंभरे, समाज कल्याण समिती सभापती पुजा सेठ, माविमचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी यांनीही समयोचित मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प संचालक (आत्मा) अजित आडसुळे यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी कृषी व तृणधान्य महोत्सवाच्या आयोजनाची माहिती विशद केले. दिनांक १३ ते १७ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये जिल्हा कृषी व पौष्टिक तृणधान्य महोत्सवाचे आयोजन "मोदी मैदान' टी पाईट जवळ, बालाघाट रोड, गोंदिया येथे करण्यात आले आहे. सदर ठिकाणी विविध प्रकारचे २२५ स्टॉल्स लावण्यात आलेले आहेत. कृषी महोत्सव शेतकरी, कृषी अभ्यासक व नागरिकांसाठी पर्वणी असून महोत्सवाची वेळ सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत असणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी कृषी महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंडळ कृषी अधिकारी सालेकसा नंदु वानखडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार कृषी उपसंचालक धनराज तुमडाम यांनी मानले. कार्यक्रमास शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंभोरा येथे वैनगंगा नदीवरील केबल-स्टेड पुलाचे लोकार्पण

## विदर्भातील जल पर्यटनाला नवी दिशा मिळणार, अंभोरा केबल-स्टेड पुल म्हणजे 'स्टेट ऑफ आर्ट'

**नागपूर/ भंडारा :** पर्यटनातून रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी ३५० कोटीचा विशेष विकास आराखडा तयार करण्यात आला असून याअंतर्गत भंडारा जिल्ह्याला १०० कोटी तर नागपूर जिल्ह्याला २५० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यातून पर्यटनाचे मोठे सर्किट तयार करून वनपर्यटनासोबतच जल पर्यटन क्षेत्राचा विकास तसेच पर्यटकांसाठी विविध सुविधा निर्माण करून जलपर्यटनाला नवी दिशा देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



नागपूर-भंडारा जिल्ह्याच्या सिमेवर अंभोरा येथे वैनगंगा नदीवरील केबल-स्टेड पुलाचे लोकार्पण व भंडारा जिल्ह्यातील पहेला-अंभोरा सिमेंट काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज झाले. त्याप्रसंगी श्री फडणवीस बोलत होते. खासदार कृपाल तुमाने, खासदार सुनील मेंढे, भंडारा जिल्हा परिषद अध्यक्ष गंगाधर जीभकाटे, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, भंडाराचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, आमदार राजू पारवे यावेळी उपस्थित होते.

अंभोरा पुलाच्या मध्यवर्ती भागातून परिसरातील नैसर्गिक सौंदर्य, पाच नद्यांचा संगम आणि वनक्षेत्र पाहण्यासाठी प्रेक्षक गॅलरी बांधण्यात आली आहे. प्रेक्षक गॅलरी हे या पुलाचे वैशिष्ट आहे. यामुळे पर्यटकांना सुविधा झाली आहे. पर्यटन हा जगातील सर्वाधिक रोजगार निर्माण करणारा उद्योग, ही बाब लक्षात घेऊन आंभोरा परिसरात जल पर्यटन विकासाचे काम करण्यात येणार आहे. येथे बोटिंग, वॉटर स्पोर्ट्स, पाण्यातले साहसी खेळ, हॉटेल व्यवस्था आदी उद्योगातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल. रोजगारात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. पुर्व विदर्भात वन पर्यटनासोबतच जल पर्यटनासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येतील, असा शासनाचा प्रयत्न असून जलपर्यटन, जंगल सफारी, ट्रेकींग अशा विविध तयार होणाऱ्या बाबीतून याभागात मोठे परिवर्तन दिसेल, असे ते म्हणाले.

व्यापाराची लाईफ लाईन असलेला समृद्धी महामार्ग भंडारा, गडचिरोली, गोदिया, चंद्रपूर या पूर्व विदर्भात वाढविण्यात येणार आहे त्याचा लाभ ही येथील पर्यटन व उद्योग व्यवसायांना होईल. यासोबतच वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प राबविण्यात येणार असून गोसेखुर्द प्रकल्पाचे वाहून जाणारे पाणी सहाशे किलोमीटर कॅनल द्वारे नागपूर-वर्धा-यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवून संपूर्ण विदर्भात सिंचनाचे जाळे तयार करण्यात येणार आहे. एकूण ८८ हजार कोटी रूपयांचा हा प्रकल्प असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष बैठक घेण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले की अंभोरा केबल-स्टेड पुल म्हणजे मस्टेट ऑफ आर्टफ प्रकल्पाचे उत्तम उदाहरण असून नवीन तंत्रज्ञान, कल्पना आणि वैशिष्ट्यांचा समावेश असलेला हा अत्याधूनिक पूल आहे. याठिकाणी नागपूरच्या फुटाळा-शो प्रमाणे लाईट व साऊंड शो लवकरच सुरूकरण्यात येणार आहे यात अे.आर. रहेमान यांचे संगीत घेतले आहे. हा पूल व शो बघण्यासाठी जगातील पर्यटक येथे येतील. अंभोरा परिसरात पर्यटनातून रोजगार उपलब्ध होण्याची सुरुवात या पुलामुळे झाली असल्याचे ते म्हणाले. पूर्वी या भागातील लोकांना भंडारा जाण्यासाठी ६० किलोमीटरचा फेरा पडत होता आता पुलामुळे भंडाऱ्याचे अंतर केवळ २० किलोमीटरवर आले आहे. या पुलामुळे येथील वाहतुकीची समस्या सुटेल व दळणवळणाचा खर्च देखील कमी होईल. गोसेखुर्द जल पर्यटनाचा जागतिक दर्जानुसार विकास करण्यात येईल पर्यटनातून येथील स्थानीकांना मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल असेही श्री गडकरी यांनी सांगितले.

यावेळी खासदार सुनिल मेंढे, आमदार राजू परवे यांनीही मनोगत व्यक्त केले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. एकमेव केबल स्टेड पूल असलेल्या अंभोरा पुलाची लांबी ७०५.२० मीटर असून या प्रकल्पाचे एकूण किंमत १७८ कोटी रुपये इतकी आहे. पुलाच्या मध्यभागी ४० मीटर उंचीवर प्रेक्षक गॅलरी उभारण्यात आली यात एकावेळी दिडशे लोक बसू शकतात, अशी व्यवस्था असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच भंडारा जिल्ह्यातील पहेला-अंभोरा हा रस्ता ७.६० किलोमीटर लांबीचा असून या प्रकल्पासाठी २४.९० कोटीची मान्यता मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला नागपूर व भंडारा जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणेचे पदाधिकारी व अधिकारी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# परीक्षेत एकावर एक सात अंतर्वस्त्रात मोबाईल लपवून केली कॉपी,अखेर फसलाच

**गोंदिया :** कॉपी करून पास होणाऱ्या बहाद्दरांची आपल्याकडे काही कमी नाही. कॉपी करण्यासाठी अनेक युक्त्या त्यांच्याकडे असतात अशीच एक घटना राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून घेण्यात आलेल्या विविध पदांच्या भरती परीक्षेत उघडकीस आली. एका तरुणाने एकावर एक अशी तब्बल सात अंतर्वस्त्रे घालून त्यात मोबाइल लपवून आणला. ब्लू टूथद्वारे परीक्षेत गैरप्रकार करण्याचा त्याचा प्लान मात्र काही वेळातच उघडकीस आला. त्या तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिरोडा येथील राजीव गांधी आयटीआय येथे राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे शनिवारी (दि.१३) दुपारी २:३० ते ३:३० वाजतादरम्यान भरती परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत औरंगाबाद जिल्ह्यातील ग्राम टाकळी येथील आरोपी धीरज महासिंह सुंदर्डे (१९) याने चक्क एकावर एक सात अंतर्वस्त्रे घालून त्यामध्ये मोबाइल लपवून ठेवला होता. परीक्षेत धीरज सुंदर्डे याच्या संशयास्पद हालचाली सुरू असल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक अतुल पुरणलाल बन्सोडे (४०) यांना संशय आला. त्यांनी त्याच्यावर पाळत ठेवली.

इअरफोनच्या माध्यमातून परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे तो दुसऱ्याकडून मागवीत असल्याचे पाहून अतुल बन्सोडे यांनी त्याला रंगेहात पकडले. त्याला दुसऱ्या खोलीत बोलावून त्याची झडती घेतली असता, त्याने पॅन्टच्या आत एकावर-एक अशा सात अंडरविअर घातल्या होत्या. त्याला तपासले असता, त्याच्याजवळ चार हजार रुपये किमतीचा मोबाइल, ब्लूटूथ डिवाइस व इअरफोन असा ५ हजार २०० रुपयांचा माल आढळून आला. धीरज सुंदर्डे विरुद्ध केलेल्या तक्रारीत तिरोडा पोलिसांनी महाराष्ट्र विद्यापीठ बोर्ड आणि इतर नमूद परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरव्यवहारांना प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलिस हवालदार टेंभरे करीत आहेत.

### मेटल डिटेक्टरने शोधला मोबाइल

**धीरज सुंदर्डे हा परीक्षेला बसला असता, त्याच्या हालचाली बघून एम.एस.एफ. या कंपनीतील एक महिला व दोन पुरुष कर्मचाऱ्यांना त्याच्यावर संशय आला. ते पाळत ठेऊन असतानाच त्यांचा संशय बळावला व त्यांनी या प्रकरणाची माहिती अतुल बन्सोडे यांना दिली. तेव्हा त्यांनी धीरज सुंदर्डे याची मेटल डिटेक्टरद्वारे व प्रत्यक्ष अंगझडती घेतली असता, त्याने परिधान केलेल्या सात अंडरविअरच्या आत मोबाइल आढळून आला.**

# भिंत फोडून मोबाईल गॅलरीतून पाच लाखाचे मोबाईल चोरणाऱ्या झारखंडच्या दोघांना अटक

**गोंदिया:** आमगावच्या पाणी टाकी जवळील शिवणकर चाळ मध्ये असलेल्या पवार मोबाईल गॅलरीच्या मागणी भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी ५ लाख ६० हजार रूपये किंमतीचे २८ मोबाईल २ ऑक्टोबर रोजी सकाळी पळविले होते. या प्रकरणातील दोन आरोपींना झारखंडच्या राधानगर पोलीस ठाणे हददीतील पियारपुर गावातून अटक करण्यात आली. लुटू शेख (३०) व असरुद्दीन शेख (४०) झारखंड अशी आरोपींची नावे आहेत.



### आरोपी होते बांगलादेशात पळण्याच्या तयारीत

**आरोपी लुटू शेख (३०) व असरुद्दीन शेख (४०) हे बांगलादेशामध्ये पळून जाण्याचा तयारीत असतांना आमगाव पोलिसांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्या दोघांना पकडून त्यांच्या जवळील दोन मोबाईल हस्तगत केले आहे.**

आमगाव तालुक्याच्या बंजारीटोला येथील दुर्गेश डिगलाल गौतम यांच्या पवार मोबाईल गॅलरीची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी ही चोरी केली. आमगावच्या गांधी चौक ते कामठा चौक दरम्यान असलेल्या जून्या पाणी टाकीच्या जवळ शिवणकर चाळ आहे. या चाळमध्ये भाड्याने घेतलेल्या खोलीत पवार मोबाईल गॅलरी उघडण्यात आली. १ ऑक्टोबरच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी या मोबाईल गॅलरीच्या मागील भागाची भिंत तोडून त्या मोबाईल गॅलरीतून अत्यंत महागडले असलेले २८ मोबाईल पळविले. त्या मोबाईलची किंमत ५ लाख ६० हजार सांगितली जाते. या मोबाईल गॅलरीचे मालक दुर्गेश डिगलाल गौतम रा. बंजारीटोला हे २ ऑक्टोबर रोजी नेहमीप्रमाणे सकाळी १० वाजता आपली दुकान उघडण्यासाठी आले असतांना त्यांच्या दुकानातील साहित्य अस्ताव्यस्त फेकले होते. आपल्या दुकानात चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी मोबाईलवर आमगाव पोलिस ठाण्यात संपर्क केला. आमगाव पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणातील आरोपींना झारखंड येथून अटक केली आहे.

# "जाणता राजा' महानाट्याचे २१ ते २३ जानेवारी दरम्यान कार्यक्रमाचे आयोजन

**गोंदिया:** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमीत्त पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाद्वारे इंदिरा गांधी स्टेडियम, गोंदिया येथे दिनांक २१ जानेवारी ते २३ जानेवारी २०२४ या कालावधीत "जाणता राजा' महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची, नितीची, चरित्राची, विचारांची व कार्यकुशलतेची महती सर्वसामान्यांना विशेष करुन तरुण पिढीला मार्गदर्शक ठरावी, तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली व अलौलिक वारशाची जोपासणा करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

तरी जिल्ह्यातील नागरिकांनी "जाणता राजा' महानाट्य कार्यक्रमाचा भरपूर आनंद घ्यावा, अशी माहिती जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी पत्रकार परिषदेत दिली. निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

# स्वच्छ सर्वेक्षणात गोंदियाची माघार

**गोंदिया:** केंद्र शासनाने २०२३ मध्ये राबविलेल्या स्वच्छता सर्वेक्षणाची आकडेवारी नुकतीच जाहीर केली. त्यात गोंदिया पालिका गतवर्षीच्या तुलनेत तब्बल ११ क्रमाकांने खाली घरसल्याचे समोर आले आहे. पालिकेने जाहीर झालेल्या सर्वेक्षणात देशातून १४५ वा स्थान प्राप्त केला.तर राज्यात २९ वा क्रमांक पटकावला.




क ` द्र शासनाच्यावतीने स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत आहे. त्या माध्यमातून शहर स्वच्छ असण्यावर भर देण्यात येत आहे. त्या स्वच्छता अभियानाची पाहणी केंद्रीय पथकांकडून करण्यात आली. केंद्र शासनाच्यावतीने २०२३ मध्ये राबविण्यात आलेल्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत या स्पर्धेत देशातील ४ हजार ४७७ शहरांचा समावेश होता. स्वच्छ भारत सर्वेक्षणाची आकडेवारी नुकतीच जाहीर करण्यात आली. त्यात गोंदिया नगरपालिका गतवर्षीपेक्षा माघारली असल्याचे आकड्यांवरुन दिसून येत आहे. २०२२ मध्ये गोंदिया नगरपालिकेला देशपातळीवर १३४ वा क्रमांक मिळाला होता. मात्र २०२३ मध्ये ११ अंकांनी घसरण होऊन १४५ व्या स्थानार समाधान मानावे लागले. डम्पिंग यार्ड, सांडपाणी व्यवस्थापन यांसह विविध विषयांवर गुणांकन करण्यात आले. गत वर्षभरापेक्षा जास्त कालावधीपासून गोंदिया पालिकेवर प्रशासक राज आहे. त्यामुळे देखील स्वच्छतेवर परिणाम झाला आहे. अनेकदा नागरिकांकडून स्वच्छतेच्या मुद्यावरुन गदारोळ करण्यात आला. त्याचीच प्रचिती केंद्र शासनाचे जाहीर केलेल्या निकालातून समोर आली आहे.

# मानवी जीवनात खेळाला अनन्यसाधारण महत्व-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

## महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**गोंदिया :** महसुल शासनाचा महत्वाचा विभाग असून जिल्ह्यात येणाऱ्या अनेक घडामोडींना सामोरे जावे लागते. कामाच्या व्यस्ततेतून आरोग्याकडे लक्ष देता यावे यादृष्टीने खेळाकडे वळावे. खेळाच्या माध्यमातून मानसिक व शारिरीक आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत होते. त्यामुळे मानवी जीवनात खेळाला अनन्यसाधारण महत्व आहे. या क्रीडा स्पर्धेत सहभाग घेवून विजय मिळवावा, त्यासोबतच विभागीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्ह्याचे नाव लौकीक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले.



११ ते १३ जानेवारी २०२४ दरम्यान आयोजित जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना जिल्हा क्रीडा संकुल, गोंदिया येथे प्रारंभ झाला. त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी क्रीडाज्योत व दीप प्रज्वलित करुन केले. अपर जिल्हाधिकारी घनश्याम भुगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) चंद्रभान खंडाईत, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. गोतमारे म्हणाले, मानवाने जीवनात सुदृढ, निरोगी व आनंददायी जीवन जगण्यासाठी तसेच शारिरीक व मानसिक आरोग्यासाठी नियमितपणे खेळणे व व्यायाम करणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात प्रत्येकाने खेळासाठी थोडा वेळ दिला पाहिजे. या स्पर्धेच्या निमित्ताने सराव करावा. खेळ व व्यायाम यांच्या अभावामुळे कमी वयातच व्यक्ती अनेक रोगांना बळी पडत आहेत, म्हणून खेळकडे वळा. दिवसातील अर्धा, एकतास खेळासाठी द्या, असा संदेश देवून ते पुढे म्हणाले, शारिरीक सुदृढतेसोबतच मानसिकदृष्ट्या सुध्दा सुदृढ राहण्यासाठी महसूल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. स्पर्धकांनी खेळाडूवृत्ती जोपासून खेळ खेळावे. खेळाच्या स्पर्धेत आपले कौशल्य दाखवावे. सर्व खेळांचा आनंद घ्यावा व मित्रत्वाचे संबंध टिकवून ठेवावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

पोलीस अधीक्षक श्री. पिंगळे म्हणाले, शरीर हे क्रीडांगण आहे. आपले शरीर सुदृढ, निरोगी व परिपक्वअसले पाहिजे. सुदृढ शरिरात सुदृढ मन असले पाहिजे. खेळल्याने मनुष्याचा शारिरीक व मानसिक विकास होत असतो. प्रत्येकाने रोज सकाळी खेळल्याने व व्यायाम केल्याने शरिरातील मस्तिष्क व मन संतुलीत राहते. शरिराची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. खेळल्यामुळे व व्यायाम केल्याने मुनष्य निरोगी राहतो व शरीर बळकट बनते. स्पर्धकांनी खेळ खेळतांना आपली काळजी घ्यावी. स्पर्धकांनी खेळामध्ये वादावाद करु नये. पंचांनी दिलेला निर्णय मान्य करावे असे त्यांनी सांगितले.

अपर जिल्हाधिकारी श्री. भुगावकर म्हणाले, महसूल क्रीडा स्पर्धेला एक परंपरा आहे. क्रीडा संस्कृती आपल्या जीवनात रुजविण्याची आज आवश्यकता आहे. खेळात सर्व समावेशकता असली पाहिजे. खेळल्याने व व्यायाम केल्याने आपल्या शरिराचे स्नायु बळकट होत असतात. खेळामुळे सर्वांगीण विकास होत असतो. सर्व स्पर्धकांनी खेळाडूवृत्तीने खेळ खेळावे असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकातून निवासी उपजिल्हाधिकारी म्हणाल्या की, दरवर्षी मससूल क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. खेळ हा मानवी जीवनातील एक मुलभूत अंग आहे. महसूल विभागात काम करतांना सर्वांना ताण-तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी प्रत्येकाने व्यस्त कामातून खेळासाठी वेळ दिल्यास आपले आरोग्य निरोगी राहते. त्यासोबतच सांघिक भावनेने खेळ खेळावे, त्यामुळे खेळाडूवृत्ती तयार होवून कामात कितीही त्रास झाल्यास मन विचलीत होत नाही. जीवनात मानवाचे आरोग्य सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी खेळाला अनन्यसाधारण महत्व आहे. सर्व खेळाडूंनी आनंदमय वातावरणात निखळपणे खेळावे व खेळाडूवृत्ती जोपासावी. या महसूल क्रीडा स्पर्धेत एकूण ४०० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी मान्यवरांनी एकूण ५ उपविभागाचे पथसंचलनाचे निरीक्षण केले. पथसंचलनात एकूण ५ उपविभागापैकी तिरोडा उपविभाग संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना खेळात वचनबध्दता, प्रतिबध्दता व खेळाडूवृत्ती जोपासण्यासाठी क्रीडा विषयक शपथ दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती मंजुश्री देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधीक्षक उध्दव नाईक, तहसिलदार समशेर पठाण, अपर तहसिलदार विशाल सोनवने, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, नाझर राकेश डोंगरे, तलाठी रियाद तुर्क, शिपाई श्री. गुर्व्हेले यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सर्वश्री वरुणकुमार शहारे (अर्जुनी/मोर), पर्वणी पाटील (गोंदिया) पुजा गायकवाड (तिरोडा), जिल्हा पुरवठा अधिकारी देवराव वानखेडे, तहसिलदार सर्वश्री अनिरुध्द कांबळे (अर्जुनी/मोर), रमेश कुंभरे (आमगाव), अनिल पवार (देवरी), नरसय्या कोंडागुर्ले (सालेकसा), निलेश काळे (सडक अर्जुनी), गजानन कोक्कडे (तिरोडा), किशन भदाने (गोरेगाव) यांचेसह महसूल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार उपजिल्हाधिकारी (सामान्य) चंद्रभान खंडाईत यांनी मानले.

# ग्रामपंचायतींच्या कामात जि.प.चा हस्तक्षेप

## सरपंचांचा आरोप: परस्पर काम करुन घेत असल्याने झाले आक्रमक

**गोंदिया:** ग्रामपंचायत ही संस्था गावस्तरावरील स्थानिक स्वराज्य आणि स्वायत्त संस्था आहे. असे असतानाही जिल्हा परिषदेचे पदाधिकारी आणि अधिकारी ग्रामपंचायतींच्या अधिकार क्षेत्रात ढवळाढवळ करीत आहेत. कामांची देयके परस्पर दिली जात असल्याने विकासकामांची गुणवत्ता ढासळल्याचा आरोप करण्यात आला असून हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही सरपंचांनी दिला. या संदर्भातील निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.



ग्रामपंचायतीला कामांचे अधिकार दिले आहेत. मात्र असे असतानाही जलजीवन मिशन, १५ लाखांवरील कामांचा कार्यारंभ आदेश, १५ व्या वित्त आयोगासह अनेक लेखाशिषांतर्गत मंजूर कामांसाठी ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. मात्र त्या प्रमाणपत्राशिवाय जिल्हा परिषद देयके मंजूर करुन कंत्राटदारांना पैसे देत आहे. त्यामुळे कामे दर्जाहीन होत आहेत. एकप्रकारे जिल्हा परिषद ग्रामपंचायतींच्या अधिकार क्षेत्रात हस्तक्षेप करुन अधिकारांवर गदा आणत आहेत. कामांवरील ग्रामपंचायतींच्या देखरेखीचा अधिकार हिरावून घेत जिल्हा परिषद कंत्राटदारांशी थेट संबंध साधत असल्यामुळे कामांच्या दर्जावर परिणाम झाला आहे. १५ लाख रुपयांपर्यंतची कामे बाह्य यंत्रणेकडून न करता ग्रामपंचायतला देण्यात यावी. कोणत्याही कामाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय देयके काढू नये, आदी मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना तालुका सरपंच संघटनेच्यावतीने देण्यात आले.

यावेळी सोनू घरडे, भुमेश्वर सुलाखे, सरीता ठाकरे, कविता लिचडे, स्वाती टेंभरे, रंजीता रहांगडाले, राणू तुरकर, सुषमा उके, उमेश्वर चौधरी, सरीता कावरे, माधुरी पले, सरोजनी दांद्रे, दीपिका बिसेन, उर्मिला पंधरे, भुमेश्वरी नागपुरे, लक्ष्मी श्रीवासरी, शंकरलाल टेंभरे, लक्ष्मीचंद पाचे, मनीष गहेरवार, जितेंद्र ढेकवार, लोकचंद कापसे, योगेश पटले, नितेश पागोटे, लिविन डोंगरे, प्रफुल गणवीर, हिरामन मसराम, हंसलाल ठाकरे आदि उपस्थित होते.